
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ३३०
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, १७ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
राज्यातील ४८३ गावांना दरडींचा धोका/२
'निरंजन डावखरे विजयाची हॅट्ट्रिक करतील'/६
ऑस्ट्रेलियाचा स्कॉटलंडवर विजय; इंग्लंड सुपर ८ फेरीसाठी पात्र/८

## सिक्कीममध्ये ढगफुटी; महाराष्ट्रातील २८ जण अडकले



**डेहराडून :** महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. तर काही ठिकाणी मात्र अद्याप मान्सूनचे आगमन झाले नाही. राज्यासह देशभरातही वेगवेगळ्या ठिकाणी पावसाची स्थिती वेगवेगळी आहे. त्यात सिक्कीममध्ये मात्र पावसाने हाहाकार माजवला आहे. याठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला आहे. या पावसामुळे १५०० ते २००० पर्यटक अडकले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील २८ जणांचा एक ग्रुप सिक्कीम येथील लाचोंग या ठिकाणी अडकला असून, त्यांची लवकरात लवकर सुटका व्हावी यासाठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रयत्न करत आहेत. पर्यटकांपर्यंत मदत पुरवण्याचे मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला आदेश दिले आहेत. अडकलेल्या पर्यटकांच्या सुटकेसाठी दोन हेलिकॉप्टर तयार आहेत, परंतु ढग आणि ख़राब हवामानामुळे त्यात अडचणी येत आहेत. मुख्यमंत्री कार्यालयातली टीम रेग्युलर टीमच्या सतत संपर्कात आहे.

# तुमचे कष्ट विसरणार नाही -खासदार बारणे

## भव्य नागरी सत्कारात पनवेल, उरणच्या कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता



**पनवेल : प्रतिनिधी**

**माझ्या विजयासाठी तुम्ही घेतलेले कष्ट मी आयुष्यभर विसरणार नाही. आता आपण विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागूया. पनवेलमधून आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणमधून आमदार महेश बालदी निश्चित विजयी होतील, असा दावा मावळ लोकसभा मतदारसंघाचे सलग तीन वेळा निवडून आलेले खासदार श्रीरंग बारणे यांनी पनवेल येथे रविवारी (दि. १६) भव्य नागरी सत्कार सोहळ्यात बोलताना केला.**

पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदार संघाचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे, भाजप उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी म्हाडाचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील, भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, प्रवीण पाटील, रवी म्हात्रे, प्रकाश बिनेदार तसेच मयूरेश नेतकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक रमेश गुडेकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील व आरपीआय, मनसे व शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, संविधान बदलणार म्हणून सांगून विरोधकांनी गैरसमज निर्माण केला. आता केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आले आहे. संविधानात कोणताही बदल होणार नाही हे लोकांना समजेल. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी सकारात्मक विचार करून गावागावात जाऊन लोकांचे गैरसमज दूर करा. कोकण पदवीधर मतदारसंघात निरंजन डावखरे यांना मतदान करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आपल्याला येथे काम करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद व आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांचे सहकार्य मिळाले. त्यांनी केलेल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला नाव देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे गेला आहे. नागरी उड्डाण खात्याचे मंत्री राम नायडू यांच्याकडे पाठपुरावा करून लवकरच ते पूर्ण करण्याची खात्री दिली. **(पान २ वर..)**

### लोकांच्यात जाऊन त्यांचे प्रश्न सोडवूया -लोकनेते रामशेठ ठाकूर

सोहळ्याच्या अध्यक्षपदावरून बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खासदार श्रीरंग बारणे यांचा सत्कार यापेक्षा मोठा भव्य दिव्य व्हावा, अशी आपली इच्छा होती. देशात आपले सरकार आले आहे, उत्साहाने काम केले पाहिजे. आपण कोठे कमी पडलो याचा अभ्यास करायचा आणि संरक्षणात्मक भूमिका न घेता आक्रमक भूमिका घ्यायची आहे. इथले प्रश्न घेऊन लोकांच्यात जाऊ म्हणजे लोक आपल्याबरोबर येतील. स्टेजवर भाषण करण्यापेक्षा गावागावात जाऊन त्यांचे प्रश्न सोडवूया. विरोधकांना त्यांची जागा दाखवून देऊया, असे सांगून त्यांनी खासदार श्रीरंग बारणे यांच्या कार्याचे कौतुक केले.

### 'महायुतीतल्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मनापासून धन्यवाद'

आमदार प्रशांत ठाकूर यांनी महायुतीतल्या सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते ज्यांनी या निवडणुकीमध्ये आप्पांचा विजय साध्य करण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली अशा सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन केले व मनापासून धन्यवाद दिले. ते म्हणाले की, या देशांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या पद्धतीने २०१४ सालापासून या देशाच्या विकासासाठी काम केले त्याला देशातल्या जनतेने कौल दिला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार लागोपाठ तिसऱ्यांदा बहुमताने या ठिकाणी सत्तेमध्ये सहभागी झाले. त्याबद्दल त्यांचेसुद्धा आपण मनापासून अभिनंदन करूया.

## महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होण्याची अद्याप प्रतीक्षा

**पुणे : प्रतिनिधी**



सध्या मान्सूनच्या वाटचालीमध्ये आजही काहीच प्रगती झालेली नाही. विदर्भामध्ये पावसाची प्रतीक्षा असून, मराठवाडा, कोकण, मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मात्र पाऊस होत आहे. त्याचा जोर कमी झाला असून, काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे.

दरम्यान, पुणे शहरात ऊन सावल्यांचा खेळ चांगलाच रंगलेला पहायला मिळत आहे. दुपारी पांढरे ढग आणि निळेशार आकाश प्रत्येकाचे मन मोहून घेत आहे. सध्या कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होत आहे. पावसाने काही भागात उघडीप दिली असून, त्या भागात उन्हाचा चांगलाच चटका आणि उकाडा अनुभवायला मिळत आहे.

सध्या खान्देश आणि पूर्व विदर्भात मॉन्सूनची वाट पाहिली जात आहे. आज रविवारी (दि. १६) राज्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे, विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. रायगडला १९ ते २० जून रोजी, रत्नागिरी, सिंधुदुर्गात तुरळक ठिकाणी १८ ते २० जून रोजी यलो अलर्ट दिला आहे. तसेच मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही यलो अलर्ट आहे.



**पनवेल :** सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. ज्ञानदेव कुंडलिक म्हस्के यांची नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी 'रयत'चे (माध्यमिक) सहसचिव बी. एन. पवार, ऑडिटर शिवलिंग मेनकुदळे आदी उपस्थित होते.

## निवडक

### गंगा नदीत बोट बुडाली; १३ सुखरूप, चार जण बेपत्ता

**पाटणा :** बिहारच्या पाटणा जिल्ह्यातील गंगा नदीवर स्नान करण्यासाठी निघालेल्या भाविकांची बोट अचानक बुडाली. यामध्ये १७ प्रवासी होते, त्यातील १३ जणांना वाचवण्यात यश आले आहे, तर चार जण बेपत्ता आहेत. स्थानिक नागरिक आणि रेस्क्यू टीमकडून त्यांना शोधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. एनएचएआयचे निवृत्त अधिकारी अवधेश प्रसादही बेपत्ता आहेत. त्यांची पत्नी बचावली आहे.

### ईव्हीएम हॅक होऊ शकत नाही; निवडणूक अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

**मुंबई :** ईव्हीएम हॅक होऊ शकते. त्यामुळे ईव्हीएम बंद करण्याचे आवाहन टेस्ला कंपनीचा मालक एलॉन मस्क याने ट्विटमध्ये केले. त्यांचे ट्विट रिट्विट करत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ईव्हीएमवर निशाणा साधला. या प्रकरणावर निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. ईव्हीएम हा ओटीपीवर ओपन होत नाही. ईव्हीएम हॅक होऊ शकत नाही, असे निवडणूक अधिकारी म्हणाले. आम्ही या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे, असेही निवडणूक अधिकारी म्हणाल्या.

## आता एसटी पास थेट तुमच्या शाळेत!

### महामंडळाची दिलासादायक योजना

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य एसटी महामंडळाने आजपर्यंतची सर्वात जबरदस्त योजना आणली आहे. या योजनेमुळे लाल परीने प्रवास करणाऱ्या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम राबबली जाणार आहे.

शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना आता एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. तशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत.

विद्यार्थी, विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापन कडून पास घेतले जात असत, पण यंदापासून विद्यार्थ्यांना पास साठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या



शाळा-महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्यांकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही.

या संदर्भात १८ जूनपासुन एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना होणार आहे.

## सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर

**पुणे :** अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, कृषी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम प्रवेशासाठी राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) घेण्यात आलेल्या राज्य समाइक प्रवेश परीक्षेचा (एमएचटी-सीईटी) निकाल जाहीर करण्यात आला. त्यात राज्यातील ३७ विद्यार्थ्यांना शंभर पर्सेंटाइल मिळाले आहेत.

सीईटी सेलने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. एमएचटी सीईटी परीक्षा २२ एप्रिल ते १६ मे या कालावधीत घेण्यात आली. राज्यभरातील १५९ केंद्रांवर ही परीक्षा झाली. त्यातील १६ परीक्षा केंद्रे राज्याबाहेरील होती. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने घेतलेल्या संयुक्त प्रवेश परीक्षा मुख्यचा (जेईई मेन्स) निकाल या पूर्वीच जाहीर झाला आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांचे लक्ष एमएचटी-सीईटीच्या निकालाकडे लागले होते.

## वीकेण्डमुळे मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा

**मावळ : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. महामार्गावरील कार्ला फाट्याजवळ वाहतूक कोंडी झाली आहे. दीड ते दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या आहेत. वीकेण्डमुळे वाहनचालक आपल्या खासगी वाहनाने मुंबईहून पुण्याच्या दिशेने जात आहे. लोणावळा ग्रामीण वाहतूक पोलिसांकडून वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

वाहतूक कोंडीवर उपाययोजना म्हणून लोणावळ्यात एकेरी वाहतूक सुरू आहे. कारण पावसाळा सुरू झाल्याने आता महाराष्ट्रभरातून अनेक पर्यटक हे लोणावळ्यात पर्यटनासाठी येतात. त्यामुळे लोणावळ्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. स्थानिकांनादेखील या




वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनादेखील अर्धा वेळ वाहतूक कोंडीत काढावा लागतो.

यावर्षी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी लोणावळा पोलिसांनी आता लोणावळ्यातील वाहतूक एकेरी केली आहे. संपूर्ण लोणावळा शहरात नगर परिषदेच्या वतीने प्रवेश बंदीचे फलक लावण्यात आले आहेत. एकेरी वाहतूक केल्याने आता पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार नाही आणि पर्यटनाचा आनंद पर्यटकांना घेता येणार आहे.

दरम्यान, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वाहतूक कोंडी झाली आहे. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे वीकेण्ड असल्यामुळे लोणावळ्यामध्ये पर्यटनासाठी मोठ्या संख्येने येणारे पर्यटक. आता सर्वजण परतीच्या प्रवासाला निघाले आहेत. त्यामुळे लोणावळ्यातून मुंबईच्या दिशेने जाणारे आणि पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरून पर्यटक परत जात आहेत. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक काहिशी मंदावली आहे.

## बळीराजा शेतीकामात मग्न



श्रीवर्धन : जिल्ह्यात सर्वच ठिकाणी पावसाची स्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळे पावसाळ्यातील शेतीकामांचा वेगही प्रत्येक ठिकाणी कमी-जास्त आहे. श्रीवर्धन व म्हसळा परिसरात बळीराजा शेतीकामात व्यस्त असल्याचे दृष्य टिपले आहे छायाचित्रकार अमेय नाझरे यांनी.

## देशात ५० लाख नोकऱ्यांची होणार निर्मिती

### मोदी सरकार विशेष योजनेतून युवकांच्या हाताला देणार काम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोदी ३.० पर्वाला सुरवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली असून एनडीए सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात काम करण्यास सुरुवात केली आहे. अशातच आता मोदी सरकारने देशातील इलेक्ट्रॉनिक क्षेत्राला चालना देऊन देशातील युवकांसाठी तब्बल ५० लाख नोकऱ्या निर्माण करण्याचे उद्दिष्टे ठेवले आहे. त्यासाठी विशेष योजना राबवली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोदी सरकारचे लक्ष बेरोजगारी कमी



करण्यावर आहे. इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि नोकऱ्या निर्माण करण्यासाठी केंद्र सरकार योजना राबवणार आहे. केंद्र सरकार येत्या पाच वर्षांत देशातील इलेक्ट्रॉनिक उत्पादन दुप्पट करण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील. भारताचे इलेक्ट्रॉनिक उत्पादन पुढील पाच वर्षांत सुमारे २५० अब्जांपर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे. सध्या या क्षेत्रात २५ लाख लोक काम करत आहेत. तर येत्या पाच वर्षांत इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्रातील नोकऱ्या दुप्पट करून ५० लाखांपर्यंत नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

आयातीच्या बाबतीत, भारतातून निर्यात होणाऱ्या एकूण इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये चीन आणि हाँगकाँगचा वाटा ४४ टक्के आणि १६ टक्के आहे. दुसरीकडे, मोबाईल फोन आणि इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिट्स (ईसीयू) भारताच्या इलेक्ट्रॉनिक निर्यातीत आघाडीवर आहेत. अमेरिका आणि संयुक्त अरब अमिराती हे देश भारतातून इलेक्ट्रॉनिक उत्पादनांची सर्वाधिक आयात करतात.

**आमचा भर डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे सेवा देण्यावर आहे. त्यामुळे आम्ही इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनावर लक्ष केंद्रित करत आहोत तसेच आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारत आधीच प्रयत्न करत आहे, परंतु आता त्याला अधिक गती देण्याचे काम आम्ही करणार आहोत.**
**-अश्विनी वैष्णव, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री**

# तक्का परिसरात ४५ लाखांचा गांजा जप्त

## दोन आरोपी ताब्यात; उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.२ पनवेल विभागाने पनवेल जवळील तक्का येथे दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास ४५ लाखांच्या गांजासह गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त केले आहे.



पनवेल-मुंब्रा हायवेलगत तळोजे येथे दोन दिवसांपूर्वी एक कोटी रुपये किमतीचा गांजा व एक चारचाकी जप्त केले होते व दोन आरोपींना अटक केली होती. या आरोपींना कार्यालयात चौकशीसाठी आणले असता, आरोपी परवेझ शेख याचे मोबाईलवर एका अनोळखी व्यक्तीचा कॉल आला. त्याने 'अंकल, मी पनवेल येथे माल घेऊन सायंकाळी ५ ते ६ वाजे दरम्यान इनोव्हा गाडीने येत आहे,' असे बोलला. त्याच्याशी राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनीही ते अंकलच आहेत, असे बोलून माल घेऊन तक्का येथे पंचमुखी मारूती मंदिरासमोर ये असे सांगितले. त्यानुसार हनोझ होशी (रा. लोणावळा) व दिवा उंबरे हे मालासह तक्का पनवेल येथे आले असता राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले. आरोपींच्या ताब्यातून १३५ किलो गांजासह एक इनोव्हा असा एकूण ४५ लाख ७५ हजार रु. किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

कारवाई भा. प्र. से. आयुक्त राज्य उत्पादन शुल्क डॉ. विजय सुर्यवंशी, संचालक (अ. व. द.) प्रसाद सुर्वे, उपायुक्त प्रदीप पवार, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क रायगड-अलिबाग आर. आर. कोले यांचे मार्गदर्शनाखाली, निरीक्षक आर. डी. पाटणे, निरीक्षक उत्तम आव्हाड, दुय्यम निरीक्षक डी. सी. लाडके, दुय्यम निरीक्षक एन. जी. निकम, दुय्यम निरीक्षक प्रवीण माने, दुय्यम निरीक्षक कृष्णा देवरे, दुय्यम निरीक्षक अजित बडदे, दुय्यम निरीक्षक गणेश कुदळे तसेच सहा. दु. नि. जी. सी. पालवे, सखाराम पवार हे सहभागी होते.

# खून करून पसार होणाऱ्या आरोपीस अटक

**पनवेल : वार्ताहर**

कामाचे पैसे न दिल्यावरून एकाचा खून करून बिहार येथे पसार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीस गुन्हे शाखा कक्ष ३ ने कल्याण रेल्वे स्टेशन येथून अवघ्या १२ तासांत ताब्यात घेतले.



कळंबोली वसाहतीमधील रोडपालीजवळ आरोपी सद्दाम हुसेन अन्सारी (२५ रा.मुझफ्फर नगर) याने नावडे परिसरात इलेक्ट्रीक फिटींगचे काम केले होते. त्या कामाचे पैसे मागण्यासाठी तो परवेज अन्सारी (२६) याच्याकडे गेला असताना, 'आता मी तुला पैसे देऊ शकत नाही. २० तारखेला पैसे देतो,' असे परवेजने त्याला सांगितले, परंतु माझ्या कामाचे पैसे मला आत्ताच दे असे सद्दामचे म्हणणे होते. यातूनच त्यांच्यात वाद होऊन सद्दामने रागाच्या भरात त्याच्याकडे असलेला चाकू काढून तो परवेज याच्या छातीवर भोसकला. बचावासाठी त्यासाठी जुनेद (२८) हा आला असता त्यालावरही चाकूने वार केले. या हाणामारीत परवेजचा मृत्यू झाला, तर जुनेद याला एमजीएम कामोठे येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. फरार आरोपीचा शोध गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त साकोरे, पोलीस उपायुक्त काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त अजय लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मुलानी, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरे, पोलीस उपनिरीक्षक पाटील, पोलीस हवालदार जोशी, सुधीर पाटील आदींच्या पथकाने घेतला असता तो कल्याण येथे रेल्वेस्टेशन परिसरात असून बिहारला पसार होण्याच्या तयारीत होता. या पथकाने सदर ठिकाणी धाव घेवून आरोपीला अवघ्या १२ तासात ताब्यात घेतले आहे व याबाबतचा पुढील तपास कळंबोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजानन घाडगे करीत आहेत.

# फुंडे हायस्कूलमध्ये प्रवेशोत्सव साजरा



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे शनिवारी (दि.१५) प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

शाळेची घंटा वाजली आणि खऱ्या अर्थाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ची सुरुवात झाली. चिमुकली पावले शाळेकडे येऊ लागली आणि शाळेत आलेल्या या नवगतांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी तयार करण्यात आलेला सेल्फी बूथ आणि त्यासोबत विद्यार्थ्यांचे घेतलेले छायाचित्र त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होता.

शिक्षणाच्या ओढीने शाळेत प्रवेश घेतलेल्या आमच्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे आणि सर्व शिक्षकांच्या वतीने गुलाबपुष्प आणि पेन देऊन करण्यात आले.

त्याचप्रमाणे सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यालयाचे ग्रंथपाल नितीन ठाकूर यांच्या नियोजनाखाली इ. पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, स्कूल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे, गुरुकुल प्रमुख एच. एन. पाटील व सर्व सेवकांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.







**खारघर : सेक्टर २० येथील भाजी व मच्छी मार्केटमुळे येथील रहिवाशांना त्रास होत असल्याची तक्रार करण्यात आली होती. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी दोन्ही मार्केटची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यासोबतच भाजी व मच्छीमार्केट तात्पुरत्या कालावधीसाठी सेक्टर १४ येथे स्थलांतरीत करण्यासाठी जागेचीही पाहणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केली. सोबत भाजप शहराध्यक्ष प्रवीण पाटील, किरण पाटील, प्रवीण बेरा, आदित्य हातगे आदी उपस्थित होते.**





**पनवेल : पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष तथा लोकनेते दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील आणि भाजपचे खारकोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अतुल पाटील आणि सुधीर ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या जोत्स्ना ठाकूर, किशोर पाटील, सुनील पाटील, कमलाकर घरत, गजानन घरत, आशिष घरत आदी उपस्थित होते.**





**पनवेल : शहरात ऑरा फाईन ज्वेलरी या दुकानाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. दरम्यान, जागतिक पितृ दिनाचे औचित्य साधून दुकानामध्ये विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या वेळी स्टोअर मॅनेजर अंकीत सुकाळे, बिजनेस डेव्हलपमेंट मॅनेजर हेमराम प्रजापती, सागर ठक्कर, भूषण देशपांडे, कॉनरेड पिएरा आदी उपस्थित होते.**

# पावसामुळे शेतातील राब झाले हिरवेगार

## ◆ शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी केली असून, राब उत्तम तयार होत आहे. दिवसातून पावसाच्या तुरळक सरी येत असल्यामुळे राबांना संजीवनी मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत, मात्र वातावरणात उष्णता असल्यामुळे शेतकरी वर्ग चिंताग्रस्त होत आहे. पाऊस पडला तर शेतकरी वर्गांनी टाकलेला राब लवकर तयार होऊन भातलागवडसुद्धा होईल, मात्र यासाठी पावसाने उत्तम हजेरी लावली पाहिजे.



पावसाळा सुरू झाला की, तालुक्यातील असलेले शेतकरी वर्ग शेतीच्या कामासाठी सज्य झालेले तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे, मात्र पावसाने चांगली साथ दिली तर शेतकरी मातीतून सोने पिकविले जाईल. मागील आठवड्यामध्ये पावसाने शेतकरी वर्गास चांगला दिलासा दिल्यामुळे शेतीही पावसाच्या पाण्यामुळे भिजल्यामुळे शेतीच्या कामाला वेग आला आहे. यामुळेच आपल्या जवळ असलेली बैलाची जोडी घेऊन शेतात उखळणी सुरू झाली आहे.

दरवर्षी पाऊस नियोजित वेळेवर पडेल यांची शाश्वती नसते, मात्र यावर्षी ७ जूनला पावसाने हजेरी लावली. शेतात राब पेरणी केल्यानंतर पाऊस मौनरुप धारण करीत शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. यावर्षी वरुणराजाची बळीराजावर चांगली कृपा दृष्टी ठेवावी, असे साकडे घालत आहे.





**खारघर : येथे माहेश्वरी समाजातर्फे महेश जयंतीनिमित्त बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माहेश्वरी मित्र मंडळाचे अध्यक्ष मनोहर मुंदडा, माहेश्वरी समाजाचे राकेश सोमाणी, समाज बांधव उपस्थित होते.**

## संपादकीय

# आरोग्याशी खेळ

इंग्रजीत एक म्हण आहे हेल्थ इज वेल्थ. अर्थात, आरोग्य हीच खरी संपत्ती. ते खरंच आहे. माणूस निरोगी असेल तर त्याच्या शरीराचे कार्य उत्तमपणे चालते व तो जोमाने काम करू शकतो, पण हल्ली अन्नपदार्थांमध्ये भेसळ करण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या आईस्क्रीममध्ये मानवी बोट उडाल्याचे प्रकरण चर्चेत आहे.

**मुंबईच्या मालाडमधील एका महिलेने ऑनलाईन पद्धतीने यम्मो कंपनीचे आईस्क्रीम मागवले होते. तिने हा आईस्क्रीमचा कोन खायला सुरुवात करताच तिला त्यामध्ये चक्क मानवी बोटाचा तुकडा दिसला. आईस्क्रीममध्ये मानवी अवयवाचा तुकडा पाहताच महिला ओरडू लागली आणि बेशुद्ध पडली. काही क्षण तिच्या कुटुंबातील लोकांनाही काय झाले हे कळेना, पण त्यांना सारा प्रकार लक्षात येताच त्यांनी तत्काळ स्थानिक पोलीस ठाणे गाठले. मालाड पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. आईस्क्रीम हा थेट अन्नपदार्थाचा भाग नसला तरी आवडीने खाण्याचा एक दुग्धजन्य जिन्नस आहे. गेल्या काही वर्षांपासून प्रत्येक गोष्टीत भेसळ केली जात आहे. अन्नातील भेसळ ही जगाच्या अनेक भागांमध्ये एक गंभीर समस्या आहे. सामान्यतः दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, मसाले, धान्य, तेल आणि मिठाई तसेच अन्न उत्पादनांचे शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी हानिकारक रसायने आणि रिझर्व्हेटिव्हज यांचा वापर केला जातो. दुधाचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि ते अधिक पौष्टिक दिसण्यासाठी अनेकदा त्यात पाणी, स्टार्च आणि इतर पदार्थांची भेसळ केली जाते. भेसळयुक्त दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनामुळे अनेक आरोग्य समस्या उद्‌भवू शकतात. जसे की अन्न विषबाधा, पोटात संक्रमण आणि आजार. दूध आणि मसाल्यांव्यतिरिक्त, खाद्यतेल, कडधान्ये आणि धान्ये यांसारख्या इतर खाद्यपदार्थांमध्ये भेसळ होत असल्याच्या बातम्या आल्या आहेत. पाम तेल आणि कापूस तेल यांसारख्या स्वस्त तेलांसह खाद्यतेलाची भेसळ हृदयरोग आणि इतर आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकते. कडधान्ये आणि धान्यांमध्ये अनेकदा वाळू, दगड आणि इतर अशुद्ध पदार्थांची भेसळ केली जाते, ज्यामुळे दात आणि पाचक अवयवांचे नुकसान होऊ शकते. अलिकडे तर फळ, भाज्यांमध्ये इंजक्शने, रसायने यांचा वापरून जास्तीत जास्त उत्पादन घेतले जाते. हा झाला भेसळीचा प्रकार, पण आपण जे उत्पादन घेतो ते ग्राहकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहचवणे ही संबंधितांची जबाबदारी असते, मात्र त्यात बेपर्वाई दिसून येत आहे. मालाडमधील घटना भयंकर आहे. या सर्व प्रकरणावर आता यम्मो कंपनीने स्पष्टीकरण दिले आहे. आम्ही ही घटना अतिशय गांभीर्याने घेत संबंधित युनिटचे थर्ड पार्टी उत्पादन थांबवलेले आहे. त्या थर्ड पार्टी कंपनीने केलेली संबंधित आणि इतर उत्पादनेही बाहेर काढण्यात आली आहेत. त्या कंपनीतील उत्पादने बाजारातूनही हटवण्याचे काम सुरू आहे. उत्पादनाची गुणवत्ता आणि सुरक्षितता हे आमचे अंतिम उद्दिष्ट आहे. आमची कंपनी कायद्याचे पालन करणारी आहे आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आम्ही अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करू, असे कंपनीने म्हटले आहे. दरम्यान, अन्न आणि औषध प्राधिकरणाने (एफडीए) या प्रकरणाची दखल घेतली आहे आणि चौकशी सुरू केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जिथे या आइस्क्रीमचे उत्पादन केले होते त्या गाझियाबादच्या फॅक्ट्रीमध्ये तपास करण्यात येत आहे. त्यानंतर आइस्क्रीममध्ये बोट कसे आले याचा उलगडा होणार आहे. दोषींवर कारवाई झाली पाहिजे. म्हणजे असे प्रकार पुन्हा घडणार नाहीत.**

# ई-रिक्षा सुपूर्द केल्याने हातरिक्षाचे जोखड हद्दपार





खबरबात
विजय मांडे

माथेरान हे मुंबई-पुण्या जवळचे जागतिक पर्यटनस्थळ आहे. येथील मिनिट्रेन आबालवृद्धांचे आकर्षण होते. परदेशी पर्यटकांनासुद्धा तिला पसंती होती. येथील मिनिट्रेन म्हणजेच माथेरानची वनराणी अतिवृष्टीमुळे गेली अडीच ते तीन वर्षे बंद होती, मात्र स्थानिकांच्या पाठपुराव्यामुळे ही मिनिट्रेन माथेरान ते अमन लॉजदरम्यान सेवा देत असे. त्यामुळे पर्यटकांची दीड-दोन किलोमीटर अंतराची ती हौस भागवत असे, मात्र ऑक्टोबर महिन्यात नेरळ-माथेरान मिनिट्रेन पुन्हा धावू लागली आणि पर्यटक आणि माथेरानकरांचा चेहऱ्यावर हसू आले. माथेरान मध्ये फिरण्यासाठी घोडे आणि हातरिक्षा व्यतिरिक्त कोणताही पर्याय नव्हता. वाहन बंदी असल्यामुळे साधी सायकल चालण्याससुद्धा बंदी आहे. त्यातच हातरिक्षा चालवणे म्हणजे ती ओढण्याचे काम माणसे करतात. हा अमानवी प्रकार अनेकांना पटत नसे मात्र तेथील नियमांची पायमल्ली कोण करणार? त्यावर उपाय म्हणून माथेरानमध्ये पर्यावरणपूरक व्यवस्था व्हावी यासाठी अनेक जण प्रयत्नशील होते, मात्र मतांच्या राजकारणामुळे त्यांचा नाईलाज होता. एका शिक्षकाने हे शिवधनुष्य उचलले आणि त्यामध्ये तो यशस्वी झाला. त्यातच प्रशासक व मुख्याधिकारीपदी आलेल्या एका कर्तव्यदक्ष महिलेने येथे पर्यावरणपूरक प्रकल्प आणायचाच असा निर्धार केला आणि तो प्रत्यक्षात उतरवला. हा प्रकल्प म्हणजे ई-रिक्षा. ई-रिक्षा सुरू झाल्याने माथेरानचे पर्यटन बहरणार आहे. ई-रिक्षा हात रिक्षामालकांना सुपूर्द करण्यात येत असल्याने अत्यंत आंनददायी गोष्ट म्हणजे हातरिक्षाचे जोखाड हद्दपार होण्यास सुरुवात झाली आहे. हा क्षण माथेरानकरांसाठी ऐतिहासिक ठरत आहे.

माथेरान हे महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या रांगांमध्ये वसलेले एक अत्यंत सुंदर आणि निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. १८५० साली ठाण्याचे तत्कालिन कलेक्टर ह्यूज मॅलेट यांनी उंच डोंगराच्या कुशीत वसलेल्या माथेरानचा शोध लावला. मुंबईपासून अवघ्या ९० तर पुण्यापासून १२० किलोमीटर अंतरावर माथेरान आहे. माथेरानची मिनिट्रेन हे या पर्यटन स्थळाचे खास आकर्षण आहे. सर आदमजी पीरभोय यांनी १९०७ साली ही मिनिट्रेन स्वखर्चातून सुरू केली. नेरळ ते माथेरान या २२ किलोमीटर रेल्वे मार्गावर जुम्मापट्टी, वॉटर पाईप आणि अमन लॉज हे थांबे आहेत तेथे जाण्यासाठी सुमारे अडीच तास लागतात. मिनिट्रेन प्रमाणेच माथेरानला जाण्यासाठी घाटवळणाच्या रस्त्याचाही पर्याय आहे. दस्तुरीला पोहचल्यावर माथेरानमध्ये जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे वाहन नेण्यावर बंदी आहे. दस्तुरीहून माथेरानला जाण्यासाठी पायी, हातरीक्षा घोडेस्वारी किंवा मिनिट्रेनची शटल सेवा यातील कोणताही पर्याय निवडून माथेरानला जाता येते.

माथेरानमध्ये पूर्वी हंगामी पर्यटन असायचे मात्र आता बाराही महिने पर्यटक तेथे येतात. पावसाळ्यात पूर्वी चार महिने पर्यटन बंद असे त्यामुळे चार महिने उदरनिर्वाह कसा करायचा? असा प्रश्न उपस्थित होत असे. मात्र आता वर्षा सहलीच्या निमित्ताने एक दिवसासाठीसुद्धा पर्यटक गर्दी करतात. माथेरान शहरात दस्तुरीहून जाताना हातरीक्षाने पर्यटक जातात. त्या हातरीक्षेत माणसांनी बसायचे त्यातच त्यांच्या सामानाने भरलेल्या बॅगा पण टाकायच्या आणि ही हातरीक्षा दोघा तिघांनी ओढून वळणाच्या व काही ठिकाणी तीव्र चढ असलेल्या माती-दगडाच्या रस्त्यातून माथेरान मधील त्यांच्या इच्छित स्थळी न्यायची ही प्रथा गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे ती आजतागत. याप्रथेमुळे हातरीक्षा ओढणाऱ्यांना अकाली वृद्धत्व आले आहे तसेच या युगात हा प्रकार पाहणे म्हणजे हृदय हेलावून जाते.

माथेरानच्या हात रिक्षाचालकांची अमानविय प्रथेतून मुक्ती व्हावी यासाठी ब्रिटिश काळा पासून च्या वाहन बंदी कायद्यात बदल करण्यासाठी माथेरान नगरपालिकेकडून ई-रिक्षाचा ठराव डिसेंबर २०१२ साली पारित करण्यात आला तेव्हा नगराध्यक्ष अजय सावंत होते त्यानंतर ई रिक्षा साठी च्या पाठपुराव्यासाठी खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. राज्य सरकारच्या महसूल खात्याने विविध खात्यानं कडून शिफारशी मागविण्यात आल्या होत्या २०१५ मध्ये रायगड जिल्हाधिकारी यांची शिफारस, कोकण विभागीय आयुक्त, प्रधान सचिव नगरविकास, प्रधान सचिव पर्यावरण, माथेरान सनियंत्रण समिती व विधी व न्याय खाते यांचा कायदेशीर सल्ला घेण्यात आला व फेब्रुवारी २०१८ मध्ये नगराध्यक्षया प्रेरणा सावंत यांनीदेखील ई-रिक्षासाठी पालिकेत ठराव संमत केला.


अशा विविध खात्यांकडून शिफारशी प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकारचे पर्यावरण सचिव सतीश गवई यांनी फेब्रुवारी २०१८मध्ये केंद्रीय पर्यावरण सचिव यांना ई-रिक्षा सुरू करण्यासाठी एक सेन्सेटीव झोन अधिसूचनेत बदल करण्याची मागणी केली होती. कारण केंद्र सरकारने २००३ मध्ये माथेरांनचा समावेश इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये केला होता यात त्यांनी वाहनांना बंदी घातली होती फक्त रुग्णवाहिका व अग्निशमनच्या गाड्यांना परवानगी दिली होती, मात्र रुग्णवाहिकेचा गैरवापर होऊ लागला अजूनही तो होत आहे. रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने काही जणांना वेळेवर उपचार मिळाले नाहीत म्हणून प्राण गमवावे लागले. नकीम शेख या छायाचित्रकाराला वेळीच उपचारासाठी रुग्णवाहिका न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला होता. त्यावेळी रुग्णवाहिका खासगी कामासाठी वापरण्यात आली होती, अशी उघड चर्चाही त्यावेळी माथेरानमध्ये होत होती. आपल्या वडिलांना रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने एका नागरिकाने उपोषण केले होते.

ही अमानवी नव्हे तर आत्ताच्या काळात तिला अमानुष प्रथा म्हणावी लागेल. त्याच्यावर पर्याय असावा म्हणून येथील एक शिक्षक सुनील शिंदे यांनी आपले सहकारी शकिल पटेल आणि प्रकाश सुतार यांना बरोबर घेऊन सर्वोच्च न्यायालयात लढा द्यायचा असा निर्णय घेतला. तब्बल एक तप म्हणजे १२ वर्षे ते हा लढा देत राहिले. त्यांना यश आले. दरम्यानच्या काळात नगरपरिषदेतील लोकप्रतिनिधींची मुदत संपली आणि तेथे प्रशासकांनी नियुक्ती करण्यात आली. प्रशासक म्हणून मुख्याधिकारी असलेल्या सुरेखा भणगे यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला. भणगे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आणि सनियंत्रण समिती व जिल्हाधिकाऱ्यांच्या प्राप्त सूचना, आदेश व वेळोवेळीच्या मार्गदर्शनानुसार कोणत्याही परिस्थितीत ई-रिक्षा सुरू करायची याला प्राधान्य देऊन प्रामाणिक प्रयत्न सुरू केले. स्थानिक लोकप्रतिनिधींचा त्रास तसेच अश्वपालकांचा रोष याचा विचार न करता त्यांनी ई-रिक्षा सुरू होण्यासाठीच्या सर्व तांत्रिक बाबी पूर्ण केल्या व ई-रिक्षा सुरू झाली. उडघटनाला काही लोकप्रतिनिधींनी दांडी मारली कारण त्यांना अश्वपालकांच्या मतांची भीती वाटते.

एकंदरीत नेरळ-माथेरान मिनिट्रेन, अमनलॉज-माथेरान मिनिट्रेनच्या फेऱ्या, घोडेवाले यांच्या बरोबरच थेट माथेरान शहरामध्ये पर्यटकांना घेऊन जाणाऱ्यांमध्ये आता ई-रिक्षासुद्धा सेवेत आल्याने माथेरानचे पर्यटन निश्चितच बहरेल. शिवाय ई-रिक्षेमुळे हातरीक्षा ओढून नेण्याची अमानवी प्रथाही बंद होणार आहे. ई-रिक्षेमुळे पर्यटकांचा आर्थिक भार कमी होईलच आणि विशेष म्हणजे अवघ्या पाच रुपयात विद्यार्थ्यांना माथेरान ते दस्तूरी विना प्रयास जाता-येता येईल तसेच जेष्ठ नागरिक, रुग्ण महिलांना सुद्धा या ई -रिक्षेचा चांगला उपयोग होणार आहे. खरे तर ई-रिक्षा म्हणजे माथेरानचे पर्यटन बहरण्यासाठी एक मैलाचा दगडच ठरेल. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, मात्र ई-रिक्षा चलवणाऱ्यानी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. म्हणजे ई-रिक्षा कायमच सेवेसाठी असतील. या ई-रिक्षाची नोंद माथेरानच्या इतिहासात महत्वाची ठरेल.

## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल रिचार्ज न केल्यास द्यावे लागतील अतिरिक्त पैसे



आपल्यातील अनेक जण लॉकडाऊनपासून वर्क फ्रॉम होम करतात. त्यामुळे बहुतांश जणांच्या घरी वायफाय लावून घेतलेला असतो. त्यामुळे अनेक जण मोबाईलमध्ये रिचार्ज करण्याचा कंटाळा करतात, पण तुम्हीही असे करीत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. आगामी काळात तुम्हाला तुमचा मोबाईल नंबर वापरण्यासाठी रिचार्ज व्यतिरिक्त पैसे द्यावे लागतील. विशेषतः तुमच्याकडे नंबर आहे आणि तुम्ही त्यावर रिचार्ज करत नसाल किंवा तुम्ही मोबाईलचा कमी वापर करत असाल तरच...

अनेक देशांमध्ये टेलिफोन, मोबाईल नंबरसाठी समान शुल्क आकारले जातात. कधी कधी या गोष्टी मोबाइल ऑपरेटरवर लागू होतात, तर कधी ग्राहकांना याचा फटका बसतो. तर आता ही बाब लक्षात घेता भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (टीआरएआय) हा प्रस्ताव वा नियम जारी केला आहे. सिमकार्ड दीर्घकाळ रिचार्ज न केल्यास ते ब्लॅकलिस्टला न टाकता त्या मोबाईल ऑपरेटर्सवर दंड आकारण्याची योजना आखली आहे. हे शुल्क एकरकमी किंवा वार्षिक आधारावर घेतले जाऊ शकते. ट्रायने मोबाइल फोन किंवा लँडलाइन नंबरसाठी मोबाईल ऑपरेटरकडून शुल्क आकारण्याची योजना आखली आहे. हा नियम लागू झाल्यास मोबाईल ऑपरेटर्स हा बोजा ग्राहकांवरदेखील टाकू शकतील.

ट्रायचा असा विश्वास आहे की मोबाईल नंबर हा सार्वजनिक स्त्रोत आहे, खासगी नाही. त्यामुळे याचा उपयोगदेखील सार्वजनिक वापरासाठी कसा करता येईल हे पाहिले जाईल. देशात मोबाईल नंबरची मोठी कमतरता आहे. तसेच नियमांनुसार सिमकार्ड दीर्घकाळ रिचार्ज न केल्यास ते ब्लॅक लिस्टमध्ये टाकले जायचे. त्यामुळे अशा स्थितीत ट्रायने आता सिमकार्ड दीर्घकाळ रिचार्ज न केल्यास ते ब्लॅकलिस्टला न टाकता त्या मोबाइल ऑपरेटर्सवर दंड आकारण्याची योजना आखली आहे.

अनेक देशांमध्ये टेलिफोन नंबर मोबाईल ऑपरेटरवर, तर काही देशांमध्ये या शुल्काचा फटका ग्राहकांना सहन करावा लागतो आहे. ट्रायनुसार ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, बेल्जियम, फिनलँड, यूके, लिथुआनिया, ग्रीस, हाँगकाँग, बल्गेरिया, कुवेत, नेदरलँड, स्वित्झर्लंड, पोलंड, नायजेरिया, दक्षिण आफ्रिका आणि डेन्मार्क आदी देशांचा या यादीत समावेश आहे.

# प्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर



निमित्त

आर्या अंबेकर एक मराठी पार्श्वगायक आणि नागपूर, महाराष्ट्रातील अभिनेत्री आहे. आर्याने जानेवारी २०१७मध्ये 'ती सध्या काय करते' या चित्रपटाद्वारे अभिनयात पदार्पण केले आहे. झी मराठी वाहिनीवर जुलै २००८ ते फेब्रुवारी २००९दरम्यान सा रे ग म प मराठी लिटल चॅम्प्स या संगीतमय कार्यक्रमामध्ये पहिल्या सिझनला अंतिम फेरी गाठली.

आर्यचा जन्म १६ जून १९९४ रोजी नागपुरात झाला. त्यांचे वडील समीर आंबेकर (डॉक्टर) आणि आई श्रुती आंबेकर गायक. आर्याची आजी एक क्लासिकल गायक. जेव्हा आर्या दोन वर्षांची असताना आर्यामधील प्रतिभा त्यांनी ओळखली. आर्याने तिचे गुरू आणि आई श्रुती आंबेकर यांच्याकडून वयाच्या साडेपाच वर्षांच्या असताना संगीताचे प्रशिक्षण चालू केले.

वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेत असताना आर्याने संगीतात पहिली परीक्षा दिली. तिसरीत असताना आर्याने आंतरशालेय गायनाच्या स्पर्धेत भाग घेतला आणि आपल्या शाळेला पहिले पारितोषिक मिळवून दिले. आर्याने आतापर्यंत अनेक मराठी व हिंदी भाषा अल्बम्स तसेच काही मराठी चित्रपटांसाठी व नाटकांसाठी गाणी गायली आहेत.

२०१७च्या सुरवातीस प्रदर्शित झालेल्या 'ती सध्या काय करते' या चित्रपटातून आर्याने अभिनय कारकीर्दीस सुरवात केली. यामध्ये तिने गायलेले हृदयात वाजे समथिंग हे गाणे प्रसिद्ध आहे.

आर्याची आतापर्यंतची कारकीर्द चढती राहिली आहे. सा रे ग म प लिटिल चॅम्प्स हा एक संगीतविषयक स्पर्धात्मक कार्यक्रम झी मराठी या दूरदर्शन वाहिनीवर जुलै २००८ ते फेब्रुवारी २००९ या कालावधीत प्रसारित झाला. या कार्यक्रमासाठी वय वर्ष ८ ते १४मधील मुलांच्या चाचण्या घेण्यात आल्या. आर्या सर्वोत्कृष्ट ५० स्पर्धकांमध्ये निवडली गेली आणि सा रे ग म प लिटिल चॅम्प्स या कार्यक्रमाची एक स्पर्धक झाली. आर्याने आपल्या सुमधुर आवाज आणि सांगीतिक कौशल्याच्या जोरावर अंतिम फेरीत व नंतर महाअंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत १२ स्पर्धकांची निवड झाली तर महाअंतिम फेरीत पाच स्पर्धकांची निवड केली होती.

आर्याने या कार्यक्रमांमध्ये अनेक उत्तमोत्तम गाणी सादर केली. तिच्या पान खाये सैंया हमारो या गाण्याला परीक्षकांकडून वरचा नीपर्यंत (२०० %) गुण मिळाले. हा विक्रम सा रे ग म प च्या त्या आधीच्या ८ पर्वात अबाधित होता. हिंदी सिनेसृष्टीतील नामवंत गायक हरिहरन हे त्या भागाचे परीक्षक होते.

आता आर्या एक नामवंत गायक म्हणून कार्यरत आहे. अनेक चित्रपटांमध्ये तिने गाणी गायली आहेत. तिचा आवाज पार्श्वगायनासाठी उत्तम आहे. म्हणूनच तिला अनेक चित्रपटांमध्ये संधी मिळते. त्याचबरोबर आर्याने अभिनय क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. आर्याला तिच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीबद्दल अनेक मान-सन्मान, पुरस्कार लाभले आहेत. तिचा हा प्रवास सुंदर राहिला आहे. ती अनेक मैफिलीही करते. त्याचप्रमाणे दिवाळी पहाट कार्यक्रम सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करते. (साभार : इंटरनेट)

क्लिक...क्लिक...!



अलिबाग : काही ठिकाणी पावसाने सुरुवात केली आहे. त्यामुळे वाडगाव येथील बहरत असलेल्या भात शेतीचे छायाचित्र.

## आरोग्य प्रहर

# मधुमेह असलेल्यांसाठी निर्जलीकरण धोकादायक!




जेव्हा आपण मधुमेहावर उपचार आणि व्यवस्थापन याबद्दल बोलतो तेव्हा आपण आहार, व्यायाम, झोप, औषधे यांसारख्या अनेक महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा करतो, परंतु आपण पाणी पिण्याची आणि शरीरातील पाण्याची पातळी संतुलित राखण्याच्या गरजेकडे दुर्लक्ष करतो. अगदी सौम्य निर्जलीकरणामुळे रक्तातील साखरेमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते, कालांतराने शरीराचे नुकसान होऊ शकते.

एकदा शरीरामध्ये निर्जलीकरण झाल्यानंतर रक्ताभिसरण करणाऱ्या रक्तातील साखरेची पातळी अधिक वाढते, मूत्रपिंड नंतर रक्त फिल्टर करण्यासाठी, अधिक लघवी तयार करण्यासाठी जास्तवेळ काम करते. अनियंत्रित मधुमेहामुळे जास्त लघवी, तहान लागते आणि निर्जलीकरण वाढते. यामुळे एखाद्याला डायबेटिक केटोसिस होण्याची शक्यता असते. डायबेटिक केटोसिस ही अशी स्थिती आहे जेव्हा शरीर आपल्या पेशींमध्ये रक्तातील साखरेला ऊर्जा म्हणून वापरण्यासाठी पुरेसे इन्सुलिन तयार करत नाही.

यकृतनंतर ऊर्जा निर्माण करण्यासाठी फॅट्स वापरते, ज्यामुळे सिड तयार होते जे रुग्ण कोमात जाण्यासाठी कारणीभूत ठरू शकत. किंबहुना डायबेटिक केटोसिडोसिस आणि कोमाच्या रुग्णांना दिल्या जाणाऱ्या पहिल्या उपचारांपैकी एक म्हणजे त्यांच्या शरीरात लवकरात लवकर द्रव पुरवणे. ते शरीरात पाण्याची पातळी वाढल्यानंतर इन्सुलिन दिले जाते.

आर्जिनिन व्हॅसोप्रेसिन किंवा एव्हीपी नावाचा एक अँटीड्युरेटिक हार्मोन आहे, जो शरीरातील द्रव आणि इलेक्ट्रोलाइट (मीठ शिल्लक) राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. पाणी कमी प्यायल्याने त्याच्या कार्यावर परिणाम होतो. आणखी एक यंत्रणा ज्याद्वारे शरीर निर्जलीकरण रोखते आणि मूत्रपिंडांद्वारे मीठ आणि पाण्याचे संतुलन राखते ते म्हणजे लघवीचे प्रमाण आणि रचना नियंत्रित करणे. मूत्रपिंड पाणी आणि क्षारांचे संतुलन नियंत्रित करू शकत नसल्यास, यामुळे द्रव आणि इलेक्ट्रोलाइट संबंधित आरोग्य समस्या निर्माण होऊ शकते.

साधारणपणे मधुमेह असलेल्या व्यक्तीने दररोज किमान अडीच लिटर पाणी प्यावे आणि जर SGLT२ औषध घेतले असेल तर दररोज तीन लिटरपर्यंत पाणी प्यावे, पण काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मधुमेह असलेल्या व्यक्तीचे हृदय किंवा मूत्रपिंड निकामी झाल्यास, त्यांना त्यांचे डॉक्टर पाणी व मीठ दोन्ही कमी करण्याचा सल्ला देऊ शकतात.

## निवडक

### नांदगाव हायस्कूल पर्यवेक्षकपदी पेडणेकर



**मुरूड** : श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव हायस्कूलच्या पर्यवेक्षकपदी शाळेचे सहशिक्षक प्रतीक पेडणेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या शाळेचे चेरमन फैरोज घलटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत हा निर्णय घेण्यात आला. प्रतीक पेडणेकर हे मागील १८ वर्षांपासून सहाय्यक शिक्षक म्हणून उत्तम कार्य बजावत आहेत. त्यांची पर्यवेक्षकपदी नियुक्ती होताच चेअरमन फैरोज घलटे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या वेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष बुल्लू, वरिष्ठ लिपिक मंगेश नांदगावकर, सागर राऊत, राहील घलटे, दतात्रेय खुळपे, महेश वाडकर, मिलिंद मोहिते आदी उपस्थित होते.

### रोटरी रायगड अध्यक्षपदी मनीषा नगरकर



**महाड** : तालुक्यात कार्यरत असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट संस्थेचा वार्षिक पदग्रहण समारंभ शनिवारी (दि.१५) पार पडला. या समारंभामध्ये संस्थेच्या अध्यक्षपदी मनीषा नगरकर यांची निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्षा सपना शेठ यांनी आपला कार्यभार मनीषा नगरकर यांच्याकडे सुपूर्द करून पुढील वाटचालीला शुभेच्छा दिल्या. समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संतोष मराठे हे उपस्थित होते. या वेळी सन २०२४-२५ साठी खजिनदारपदी नीरज शेठ यांची निवड करण्यात आली. विक्रम जैन, संतोष नगरकर, प्रदीप शेठ, महाड विकास मंचचे परमार आदींसह सर्व सभासद उपस्थित होते.



**माणगाव : रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी झाल्याबद्दल खासदार सुनील तटकरे यांचे येथील उद्योजक विजय मेथा यांनी अभिनंदन केले.**

# वर्षाऋतूत पर्यटकांची माथेरानला पसंती

## निसर्गाच्या विविध छटा पाहण्यासाठी गर्दी

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

वर्षाऋतुमध्ये मुंबईपासून अगदी जवळ असलेल्या माथेरानसारख्या सुंदर पर्यटनस्थळाची भ्रमंती म्हणजे पर्यटकांना एक पर्वणीच असते. त्यामुळे पर्यटक आवर्जुन हजेरी लावत असतात. अन्य पर्यटनस्थळांच्या तुलनेत केवळ वाहतुकीची खर्चिक बाब वगळता अगदीच स्वस्त दरात राहण्याची सोय लॉजिंगच्या माध्यमातून त्याचप्रमाणे हॉटेलमध्ये होत असते.



वर्षाऋतूमध्ये इथल्या नैसर्गिकरित्या साकारणाऱ्या अदभूत निसर्गाच्या चमत्काराची सप्टेंबर महिन्यात खऱ्या अर्थाने अनूभुती पहावयास मिळते. १२ महिन्यांतील पवित्र समजला जाणाऱ्या श्रावण महिन्यात इथे निसर्ग निर्मितीचा अलौकिक आंनद आणि अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी आणि श्रावण तापीच्या कोवळ्या उन्हात पॉईंट्सची सैर करण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. चोहोबाजूंनी गर्द झाडी आणि त्यातून पायी चालत जाण्याची मजासुद्धा काही औरच असते. पावसाळी हवामानात गर्द धुक्यातून मार्गक्रमण करतांना अगदी समोरचे दृश्यदेखील दृष्टीक्षेपात येत नाही. नैसर्गिक सौंदर्य धुक्यात हरवल्यामुळे ही सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील विहंगम दृश्ये न्याहाळण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. पॉईंटवरील हे दाट धुक्याचे आवरण मनाला मोहित करते. धुके विरळ झाल्यावर क्वचितच इंद्रधनूची कमान धुक्या आड दिसल्यावर मन प्रसन्न होते. शार्लोट लेकवरील ओसंडून वाहणाऱ्या पाण्याखाली भिजण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक आतुर झालेले असतात.



महत्त्वाचे जवळपास १५ पॉईंट्स असून इको पॉईंट, लुईझा पॉईंट, वन ट्री हिल, लिटिल चौक पॉईंट, सनसेट, रामबाग, हनिमून पॉईंट, मलंग पॉईंट असे काही महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्यावर खरोखरच मनाला आलेली ग्लानी दूर होते. पावसात भिजल्यावर कुठल्या स्टॉलवर गरमागरम भजी चहाचा आस्वाद घेत तर कुठे निखाऱ्यावर भाजलेला गरमागरम मका खाण्याचा मोहसुद्धा आवरता येत नाही. कुणी घोड्यावर तर आबालवृद्ध हातरिक्षाच्या साहाय्याने पॉईंट्सवरील नयनरम्य देखावे पाहण्यासाठी जात आहेत.

पावसाळ्यात चार महिने माथेरानची मिनिट्रेन बंद असते. त्यासाठी (दस्तुरी) अमन लॉज स्टेशनपासून गावात येण्यासाठी मिनिट्रेनची शटल सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे येथे शनिवार आणि रविवार त्याचप्रमाणे अन्य सुट्ट्यांच्या हंगामात यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. राहण्यासाठी लॉजिंग तसेच हॉटेल्स उपलब्ध असल्याने आगाऊ बुकिंग करण्याची सहसा आवश्यकता भासत नाही. अत्यंत स्वस्त दरात या सोयी इथे उपलब्ध आहेत.

नेरळ स्टेशनवरून इथे येण्यासाठी २४ तास टॅक्सीसेवा उपलब्ध असते. माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर उतरल्यावर पाच मिनिटांच्या अंतरावर अमन लॉज रेल्वेस्टेशनपासून माथेरान स्टेशनपर्यंत येण्यासाठी माफक दरात शटल सेवा सुरळीत सुरू आहे. हौशी पर्यटक घोड्यावरून येतात तर नव्याने दाखल झालेल्या पर्यावरण पूरक ई-रिक्षाही रात्री १० वाजेपर्यंत सेवेसाठी उपलब्ध असल्याने सर्वांना उत्तम प्रकारे सेवा आणि व्यावसायिकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

# विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सर्वोच्च न्यायालयाद्वारे विधी सेवा प्राधिकरणचे सहकार्य घेत २९ जुलै ते ३ ऑगस्ट या काळात विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. राजदेकर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने सचिव अमोल शिंदे यांनी केले आहे.

न्यायालयातील तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी मामजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरिता लोकअदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आले आहे. लोकअदालतीच्या माध्यमातून अनेक पक्षकारांनी आपली प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढली आहेत. लोकअदालतीमध्ये तडजोडीदार निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रस्तावित प्रकरणातील पक्षकारासोबतच शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे.

लोकअदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश आले आहे. लोकअदालतीचे यश लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने प्रलबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्याकरिता विशेष लोकअदालत सप्ताहाने आयोजन २९ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत केले आहे.

प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी प्रथमच असा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळा गजबजल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर शनिवारपासून जिल्ह्यातील शाळा पुन्हा एकदा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने परीसर गजबजून गेला होता. जिल्हा परिषद शाळांमध्ये पुस्तकांचे वाटप करून मुलांचे स्वागत करण्यात आले.

उन्हाळ्याची सुट्टी शुक्रवारी संपली. शनिवारपासून शाळा पुन्हा एकदा सुरू झाल्या. सकाळपासून पालक आणि विद्यार्थ्यांनी शाळांचा परिसर गजबजून गेला होता. मुलांचा किलबिलाट सुरू होता. आपआपले वर्ग शोधण्याची धावपळ सुरू होती. शिक्षक वर्ग त्यांना मार्गदर्शन करीत होता. लहान मुलांची रडारड सुरू होती. पालक त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करीत होते, तर प्राथमिक शाळेतील विद्यार्थी मोठ्या आनंदात शाळेत येत होते. जुने सवंगडी भेटल्याचा



आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. त्यांच्यासोबत नवीन वह्या, पुस्तकांचा गंधही दरवळत होता. मुलांना आवरताना शाळेतील शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू होती. विशेषतः प्रथमच शाळेत येणाऱ्या मुलांना आवरताना मोठी कसरत करावी लागत होती. पालकही मुलांच्या शाळेतील पहिल्या दिवसाबाबत चिंतेत होते. एकूणच गेल्या दोन महिन्यांपासून शांत असलेला शाळांचा परिसर मुलांच्या किलबिलाटाने दणाणून गेला होता.

शिक्षण विभागाच्या आदेशानुसार नव्याने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांच्यामध्ये आनंदी वातावरण निर्माण व्हावे या दृष्टीकोनातून आज प्रत्येक जिल्हा परिषद शाळांमध्ये शाळा प्रवेश उत्सव उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शालेय पुस्तकांचे वितरण करण्यात आले. पहिल्याच दिवशी मोफत पुस्तके देण्यात आली. खासगी शाळादेखील सुरू झाल्या. शाळेचा पहिलाच दिवस असल्यामुळे आपले मित्रमैत्रीणी पुन्हा भेटणार म्हणून विद्यार्थी आनंदात होते. पहिल्याच दिवशी शाळेत जाताना रडणारे विद्यार्थीदेखील पहायला मिळत होते.

# बकरी ईदच्या अनुषंगाने कायद्याचे पालन करावे

## प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती बैठकीत आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

बकरी ईद दरम्यान कालावधीत उच्च न्यायालयाकडील ५ जुलै २०२२च्या न्यायनिर्देश व महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा २०१५ प्राणी क्लेश कायदा १९६० वाहतूक नियमामधील तरतुदीचे पालन करणे गरजेचे आहे. या कालावधीत जिल्ह्यात या नियमांची अंमलबजावणी करून सुव्यवस्था राखण्याच्या सूचना जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीच्या बैठकीत



देण्यात आल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड येथील राजस्व सभागृहात आयोजित बकरी ईदच्या अनुषंगाने जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची बैठक निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.१५) झाली. बैठकीस नवी मुंबई पोलीस उपयुक्त ए. एल. राजपूत, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बी. ए. माळवे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त तथा सदस्य सचिव प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती डॉ. सचिन देशपांडे आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यामध्ये बकरी ईदनिमित्ताने काही प्रमाणावर कुर्बानीसाठी जनावरांची वाहतूक होते. वाहतुकीचे नियम मोडून प्राण्यांची वाहतूक होण्याची शक्यता असलेने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत तपासणी नाक्यावर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूकः केल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांनी सांगितले. राज्यात महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ लागू असून गायींची, वळूची व बैलाची कत्तल करण्यास मनाई आहे. जिल्ह्यातील तळोजे, पनवेल, खोपोली, कर्जत तालुक्यातील दामद, ममदापूर व माळोख येथे नियमीतपणे यापूर्वी मुस्लिम बांधव कुर्बानीसाठी तात्पुरत्या कुर्बानी केंद्रासाठी परवानगी मागणीबाबत माहिती देण्यात आली.

या वेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कृतिका आरमळे, डॉ. रत्नाकर काळे, डॉ. गौतम, डॉ. मारकवर यासह पशुसंवर्धन, जिल्हा परिषद, पोलीस, आरटीओ आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# खोपोलीत विद्यार्थ्यांमध्ये उत्साह

**खोपोली : प्रतिनिधी**

सुमारे दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर शनिवारी (दि.१५) शाळा सुरू झाल्या आणि विद्यार्थ्यांमध्ये एकच उत्साह पहावयास मिळाला. शाळेच्या प्रवेशद्वारावर शिक्षकांनी व संस्था पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत केले.

खोपोली नगरपरिषद शिक्षण विभागाच्या शहरातील विविध शाळांमध्ये पहिल्या दिवशी विविध उपक्रम राबविण्यात आले. यात प्रामुख्याने वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळा



व परिसरात वृक्षारोपण जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात शिक्षकांनी सहभाग घेतला. काही शाळांमध्ये पुस्तक वाटप कार्यक्रम झाला, तर काही शाळांमध्ये बालवाडीच्या विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले होते.

# शाळेतील पहिले पाऊल उज्ज्वल देश घडवेल

## गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांचे प्रतिपादन

**मुरूड : प्रतिनिधी**

शाळा ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला पर्यायाने देशाला आकार देते. विद्यार्थी उद्याचे भविष्य आहेत. त्यांना शिकण्यासाठी शासनातर्फे आपण मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश व शूज तसेच अन्य योजना कार्यान्वित करीत आहोत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस पूरक उपक्रमाचे आयोजन केल्यास विद्यार्थ्यांचे आजच शाळेतील पहिले पाऊल, प्रगत देश घडवेल, असे प्रतिपादन मुरूडचे गटशिक्षणाधिकारी



सुनील गवळी यांनी शाळाभेटीदरम्यान केले.

शनिवारी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेची पाहणी करण्याकरिता गटशिक्षण अधिकारी गवळी यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या मजगाव शाळेस भेट दिली होती.

या वेळी त्यांनी शाळेची पाहणी करताना प्रतिपादन केले. गटशिक्षण अधिकारी गवळी यांनी विविध स्पर्धा परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कारही केला, तसेच शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देवून नव्या शैक्षणिक वर्षातील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत गोयजी, मनिषा वाघरे, प्रमिला फुंदे, चेतन चव्हाण, हर्षा नांदगावकर, रंजिता केमकर व साधनव्यक्ती महेश भगत, चेतन पाटील, पुकळे सर आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळाप्रवेश उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

शनिवारपासून बहुतांशी शाळा सुरू झाल्या. शहरातील महिला मंडळ संचलित विद्याविकास मंदिर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना फुले देऊन स्वागत केले.

कर्जत महिला मंडळाचे विद्याविकास मंदिरमध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सर्व शिक्षकांनी संपूर्ण शाळा सजविली होती. त्यामध्ये फुलांची कमान, सेल्फी पॉईंट इत्यादी सर्व गोष्टीं करून प्रवेशाची जय्यत तयारी करण्यात आली. सर्वत्र फुलांच्या माळा लावून रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले.

ढोलताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. महिला मंडळ कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर यांच्या विशेष उपस्थितीत शाळेच्या मुख्याध्यापिका



स्नेहा गाढे यांनी विद्यार्थ्यांची आरती केली तसेच विद्यार्थ्यांना पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना पोषण आहार व गोड पदार्थ देण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. या वेळी श्रद्धा मुंडेकर, प्रेमा पितळे, मेघा पिंगळे, आरती कोकरे, माधुरी देशमुख, वृषाली माळी, शारदा राठोड, सुषमा सुपे, सुप्रिया भासे, अर्चना भुसाळ, सारिका साठे, नीलम बडेकर, सुमिता अहिरराव, रिंकू शर्मा, वर्षा पवार आदी शिक्षकांसह सुनंदा गायकवाड, संगीता पांडे, रजनी चंद्रमोरे तसेच पालक उपस्थित होते.

# निरंजन डावखरे विजयाची हॅट्ट्रिक करतील

## आमदार गणेश नाईक यांचा विश्वास



**नवी मुंबई : बातमीदार**

महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे हे कोकण पदवीधर मतदार संघातून तिसऱ्यांदा आमदार होतील, असा विश्वास आमदार गणेश नाईक यांनी व्यक्त केला आहे. नवी मुंबई जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने रविवारी (दि. १६) डावखरे यांच्या निवडणूक प्रचारासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

माजी खासदार संजीव नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, उमेदवार निरंजन डावखरे, विलास साठे, रवींद्र इथापे, दशरथ भगत, डॉ. जयाजी नाथ, माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, अरुण पडते, डॉ. राजेश पाटील, नवीन गवते, नेत्रा शिर्के, शुभांगी पाटील, भारती पाटील यांच्यासह कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने या बैठकीस उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार नाईक यांनी डावखरे तिसऱ्यांदा बहुमताने जिंकून येतील, असा विश्वास व्यक्त करतानाच नियोजन केल्याप्रमाणेच सर्वांनी काम करावे, असे सुचित केले. कोकण पदवीधर मतदार संघामध्ये ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग असे पाच जिल्हे येत असून दोन दोन लाख २३ हजार पेक्षा अधिक एकूण मतदार नोंदणी झालेली आहे. या एकूण मतदार नोंदणीमध्ये सर्वांत जास्त म्हणजे ३३ टक्के मतदार नोंदणी एकट्या ठाणे जिल्ह्यामध्ये झालेली आहे असे ते म्हणाले. जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी निवडणूक प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आमदार म्हणून डावखरे यांनी पदवीधर आणि शिक्षकांचे प्रश्न सोडविले असून या घटकांना न्याय दिला आहे. पाच जिल्ह्यांचा समावेश असलेला कोकण पदवीधर मतदार संघ हा मोठा मतदारसंघ आहे. केलेल्या नियोजनाप्रमाणे मतदारांच्या संपर्कात राहून विक्रमी मताधिक्याने डावखरे यांना निवडून आणण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी या वेळी केले.

जिल्हाध्यक्ष नाईक यांच्या नेतृत्वात नवी मुंबईमध्ये भाजपाचे सशक्त संघटन असून येथून आपल्याला चांगले मताधिक्य मिळेल, असा विश्वास उमेदवार निरंजन डावखरे यांनी व्यक्त केला. विजयासाठी नाईक यांचा आशीर्वाद घेतल्याचेही डावखरे म्हणाले.

# अपेक्षित पावसाच्या प्रतीक्षेत बळीराजा

## उरण तालुक्यात भातशेतीच्या पेरण्या पूर्ण

**उरण : प्रतिनिधी**

यावर्षी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे शेतकरी सुखावला असून शेतकऱ्यांनी भात पिकाच्या पेरण्या केल्या आहेत. आता पर्यंत उरण तालुक्यात अवघ्या ६० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे पेरणीनंतर आवश्यक असलेला पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांना शेती उपयुक्त पावसाच्या आगमनाची आस लागून राहिली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

उरण तालुक्यातील पूर्व तसेच पश्चिम विभागातील काही गावातच शेती शिल्लक राहिली आहे. यामध्ये विविध उद्योगासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनी तसेच समुद्राच्या भरतीचे पाणी शेतीत शिरल्याने नापिकी झालेल्या जमीनी वगळता उर्वरित शेतीवर पीक घेतले जात आहे, मात्र अनेक वर्षांपासून पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या महेंतीच्या तुलनेने लाभ होत नाही. असे असतांनाही कित्येक शेतकरी कुटुंब ही निष्ठतेने शेती करीत आहेत.

मागील अनेक वर्षांपासून उरण तालुक्यात पावसाची अनियमितता आहे. ती यावर्षी ही दिसून येत आहे. दरवर्षी उरण मध्ये सरासरी दोन हजार ९०० मिलिमीटर पेक्षा अधिक पावसाची नोंद होत आहे. तरीही शेती योग्य पाऊस होत नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावा लागत आहे. यावर्षी ही पावसाच वेळेत आगमन होऊनही शेतकरी चिंतेत आहे.

# आंबा कोयी संकलनात शालेय विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग



**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनापासून सुरू करण्यात आलेल्या आंब्याच्या कोयी संकलन उपक्रमात नवी मुंबईकर नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून सोसायट्या, ज्यूस सेंटर, रेस्टॉरंट व हॉटेल्स या ठिकाणाहून ५० हजारांपेक्षा अधिक कोयी संकलित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये सर्व वयोगटातील नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला असून विशेषत्वाने महिलांनी यामध्ये पुढाकार घेतला आहे.

या शैक्षणिक वर्षाला नुकतीच सुरुवात झाली असून शाळा, महाविद्यालये सुरू होत आहेत. त्यामुळे या मोहीमेत विद्यार्थीही उत्साहाने सहभागी होत असून आपला घरातून आंब्याच्या सुकवलेल्या कोयी आणून त्यासाठी निर्माण केलेल्या विशेष वाहनात दिल्या जात आहेत.

अशाचप्रकारे सेक्टर १४, वाशी येथील अँकरवाला एज्युकेशन केडमीच्या विद्यार्थांनी संकलित केलेल्या आंब्याच्या कोयी नवी मुंबई महापालिकेच्या कोयी संकलन करणाऱ्या विशेष वाहनात दिलेल्या आहेत.

रेड एफएम वाहिनीच्या गुटली रिटर्न्स या उपक्रमालाही नवी मुंबई महापालिकेमार्फत सहकार्य केले जात असून नागरिकांनी आंब्याचा आस्वाद घेऊन झाल्यानंतर उरलेल्या कोयी एका भांड्यात स्वच्छ पाण्याने धुवून उन्हात सुकवाव्यात व महापालिकेच्या कोयी संकलनासाठी फिरत असलेल्या विशेष वाहनात द्याव्यात आणि सक्रिय सहभागातून पर्यावरणशील दृष्टीकोन जपावा, असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# कल्याण रेल्वे न्यायालयामुळे अडीच लाख रुपयांची भरपाई

## अवजड वाहनचालकावर गुन्हा; दीड लाखांचा दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

कल्याण रेल्वे न्यायालयाच्या विशेष रेल्वे दंडाधिकारी यांच्यामुळे मध्य रेल्वेला तब्बल २.५ लाख रुपयांची भरपाई मिळाली आहे. नवी मुंबई तुर्भे येथे एका अवजड वाहनाने (कंटेनर) उंची मापकाचे नुकसान केल्यामुळे चालकावर गुन्हा दाखल करून एक लाख ६० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. मध्य रेल्वेने योग्य प्रतिनिधित्व सुनिश्चित केल्यामुळेच रिकव्हरी रक्कम प्राप्त झाली आहे.

मध्य रेल्वेने रेल्वे मालमत्तेच्या नुकसानींच्या विविध प्रकरणांमध्ये योग्य प्रतिनिधित्व सुनिश्चित केले. त्यामुळे अलिकडेच महत्वाच्या दोन प्रकरणांमध्ये एकूण ३.६५ लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून प्राप्त करण्यात आली.

९ जुन २०२४ रोजी नवी मुंबई येथील तुर्भे येथे एका अवजड वाहनाने (कंटेनर) रेल्वे पुलाच्या उंची मापकाचे (रेल्वे पुलाच्या सुरक्षेसाठी असलेला) तोडून रेल्वे मालमत्तेचे २.०५ लाख रुपयांचे नुकसान केले. याबाबतचा खटला रेल्वे संरक्षण दलाने (आरपीएफ) खटला चालवला आणि दोन लाख रुपयांपेक्षा जास्त नुकसानीची संपूर्ण भरपाई मागितली. ११ जुन २०२३ रोजी कल्याण येथील रेल्वे न्यायालयाचे विशेष रेल्वे दंडाधिकारी यांनी मध्य रेल्वेच्या बाजूने तब्बल २.०५ लाख रुपयांची भरपाई देण्याचा महत्वाचा निकाल दिला.

तत्पूर्वी २७ मे २०२४ रोजी अशाच प्रकारात भिवंडी रोड आणि खारबाव दरम्यान किमी ६१/१४ येथे 'रेलटेल'ची केबल जेसीबीमुळे खराब झाल्याचे आढळून आले होते. जेसीबीचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात उल्लेखनीय म्हणजे, गेल्या आठ महिन्यांत मुंबई विभागातील रेल्वे कायद्यातील प्रकरणांमध्ये रेल्वेला एकूण ५२ लाख रुपयांची भरपाई देण्यात आली आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान परिसरातील कचरा उचलला

## ■ सुहासिनी नायडू यांचा पाठपुरावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर ४ मधील सेक्टर ४ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान प्रवेशदार येथील कचरा गेले दोन दिवस पडून होता.



त्यामुळे विभागात दुर्गंधी पसरत होती. तर त्यामुळे डासदेखील वाढले होते. परिसराला गलिच्छ स्वरूप आले होते. तशी तक्रार स्थानिक नागरिकांनी भाजपच्या सुहासिनी नायडू यांना दिली. नायडू यांनी तातडीने पालिकेला सांगत कचरा काढून घेतला.

या परिसरात सातत्याने कचरा जमा होत आहे. यात झाडांच्या फांद्या, पाने, टाकण्यात येत आहे, मात्र त्यामुळे परिसरला गलीच्छता आलेली आहे. याबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत होती. याबाबत नायडू यांनी तातडीने ही बाब पालिकेच्या लक्षात आणून दिली. नागरिकांनीदेखील जबाबदारीने ओला व सुका कचरा वेगवेगळा डब्यात टाकावा व पालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### अत्याचारप्रकरणी पित्यावर गुन्हा

**पनवेल :** आपल्या ४ वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या पित्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद केली आहे. मागील दोन वर्षापासून या नराधम पित्याने त्याच्या चार वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचे आईने तक्रारीत म्हटले आहे. हा आरोपी पळस्पे परिसरात राहणारा आहे. त्या दृष्टीने पोलिसांचा तपास सुरू आहे.

### निलेश कचरे यांचे कौतुक

**नवी मुंबई :** पालिकेतर्फे वाशी रूग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी निलेश कचरे यांची



रक्तदान करण्याची तब्बल ४३वी वेळ होती. त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी वाशी रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजेश म्हात्रे यांच्यासह अनेक डॉक्टर तसेच रक्तदाते उपस्थित होते. कचरे म्हणाले की, रक्तदान करणे आवश्यक आहे. एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचत असतात. त्यामुळे रक्तदान करण्यासाठी सेच्छेने पुढे येऊन येणे आवश्यक आहे.

# बेलापुर येथील ग्रीन व्हॅलीत वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

वृक्ष लावा व मानवाला वाचवा, सजीव सृष्टीला वाचवा या सूत्रानुसार नोसील कंपनी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बेलापूर सेक्टर ९ येथील ग्रीन व्हॅली नर्सरीमध्ये शनिवारी (दि. १५) वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता.



कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंड म्हणजे सीएसआर फंडातून नोसिल कंपनीने तब्बल तीनशे भारतीय प्रजातीचे देशी वृक्ष दिले.

ग्रीन व्हॅली वॉकर्स असोसिएशनचे सर्व सदस्य, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने डी बी पाटील, भालेराव, नोसिल कंपनीच्यावतीने दुर्गेश, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जितेंद्र रावल व अन्य सदस्य वाघमारे, विनय मोरे, लक्ष्मण बुंदेला, प्रशांत पाटील, मारके, सुधीर दाणी हे उपस्थित होते.

ग्रीन व्हॅली परिसरात शनिवारी तब्बल १०१ वृक्ष लावण्यात आले व आगामी तीन-चार दिवसात या ठिकाणी उरलेले सर्व वृक्ष लावण्यात येणार आहेत.

**ग्रीन व्हॅली नर्सरीमध्ये अनेक झाडे वर्षानुवर्षे उन्मळून पडलेले आहेत. त्या अवस्थेत गेली अनेक वर्षे पडून आहेत. अशा पडलेल्या झाडांच्या लाकडांचा वापर नवी मुंबई महापालिकेने स्मशानभूमीत वापरासाठी केल्यास योग्य राहील.**
**-प्रशांत पाटील, पर्यावरण प्रेमी**

# विद्याभवन शाळेचा पहिला दिवस उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस आणि गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर जयंती माजी सनदी अधिकारी विजय नाहटा आणि राजकीय नेते विजय माने यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



शाळेत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थी आणि शिक्षकांनी या वेळी त्यांचे विचार प्रकट केले. माजी सनदी अधिकारी विजय नाहटा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर त्यांनी शिक्षण संकुलात चाललेल्या उपक्रमांची प्रशंसा करून सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. विजय नाहटा यांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांनी गुरुवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या संस्थेतील आणि समाजातील योगदानाबद्दल विद्यार्थी आणि सर्व उपस्थितांना माहिती दिली तसेच विजय नाहटा आणि विजय माने यांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे कार्यकर्ते दिलीप घोडेकर तसेच अनेक पदाधिकारी सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती मोटे यांनी केले.

# मोरा येथे स्वामी नारायण सत्संग सभा



**उरण : वार्ताहर**

बीएपीएस संस्थेचे कार्यकर एक अविभाज्य अंग आहे. बीएपीएस संस्थेच्या कार्यकर नियुक्तीला ५० वर्षे पूर्ण झाले. याचे औचित्य साधून उरण तालुक्यातील मोरा गावातील ११ कार्यकर यांची निवड करून त्यांना नुकताच स्वामी नरायण संस्था मुंबई येथून आलेले देव वल्लभ स्वामी व अक्षर वल्लभ स्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

स्वामी नारायण सत्संग सभा मोरा येथे दत्त मंदिरात दर मंगळवारी सायंकाळी ७.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत होते. गेली २९ वर्षापासून सत्संग सभा होत आहे.

# सुधागड विद्या संकुलात बच्चे कंपनीचे जल्लोषात स्वागत

**कळंबोली : बातमीदार**

मे महिन्याच्या सुट्टीनंतर कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात मुलामुलींचा एकत्रित किलबिलाट सुरू झाला. पहिल्याच दिवशी विद्यालयात येणाऱ्या पालकांचे आणि बच्चे कंपनीचे विद्यालयाच्या वतीने ढोल वाजवून फुलांची उधळण करून पुष्पगुच्छ व चॉकलेट भेट देऊन स्वागत करण्यात आले. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांनी प्रवेश उत्सवाचे आयोजन केले होते.

कळंबोलीतील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या मराठी प्राथमिक विद्यालयात आज पहिल्या प्रवेश उत्सव दिनाचे आयोजन मोठ्या जल्लोषात करण्यात आले होते. विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे प्रवेशद्वार विविध फुलांनी,



रंगीबेरंगी फुग्यांनी तसेच विविध रंगांच्या कागदी फुलांच्या सजावटीने मुलांचे स्वागत करण्यात आले. विद्यालयातील प्रत्येक वर्गाच्या बाहेर होतो प्रवेश दारावर रांगोळीचा सडा आकर्षक पद्धतीने टाकण्यात आला.

शाळेच्या प्रवेशद्वारावरच सरस्वती पूजन व शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिप प्रज्वलन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी व पालकांचाही सहभाग करण्यात आला.

**कळंबोलीतील सुधागड विद्या संकुल हे राज्यातील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू भाषेत एकाच छत्राखाली शिक्षण देणारे एकमेव विद्या संकुल आहे. शासनाच्या आदेशानुसार मोफत पाठ्य पुस्तकाचेही वितरण करण्यात आले. विद्यार्थी पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद हा आम्हा सर्वांनाच प्रेरणा देणाराच असा आहे.**
**-राजेंद्र बाजीराव पालवे, प्राचार्य सुधागड विद्या संकुल, कळंबोली.**

# नवी मुंबई मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ४३४ शाळा असून त्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या ५७ प्राथमिक तसेच २३ माध्यमिक शाळा आहेत. महापालिका क्षेत्रातील काही सीबीएससी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा त्यांच्या वेळापत्रकानुसार याआधीच सुरू झालेल्या आहेत.

आज शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व शाळांमध्ये महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर यांच्या नियंत्रणाखाली अत्यंत उत्साही वातावरणात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून पारंपारिक पध्दतीने स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या



विद्यार्थ्यांनी शाळेकडील ढोल - ताशे व लेझीम साहित्याचा उपयोग करून नवीन विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत केले. फुलांच्या पाकळ्या उधळून नृत्य करत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गापर्यंत नेण्यात आले.

याप्रसंगी वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षण विभागाचे उपआयुक्त योगेश कडुसकर, शिक्षणाधिकारी अरूणा यादव, शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघारे व केंद्र समन्वयक तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, पालक, शिक्षणप्रेमी व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांना गुलाबाचे फूल, चॉकलेट व गोड खाऊ देण्यात आला.

इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात होत असल्याने त्यांच्या पालकांना विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत येण्याविषयी, त्यांना अभ्यासाची गोडी लावण्याविषयी तसेच त्यांना आरोग्याच्या उत्तम सवयी लावण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## निवडक

### माणगावात बकरी ईदनिमित्त कार्यक्रम

**माणगाव :** ईद-उल-अजहा म्हणजेच बकरी ईद सोमवार १७ जुन २०२४ रोजी सर्वत्र साजरी केली जाणार आहे. या ईदची जोरदार तयारी मुस्लिम बांधवांकडून करण्यात आली आहे. रमजान ईदनंतर दोन महिन्यांनी बकरी ईद येते. या बकरी ईदला अल्लाहच्या नावाने बोकडांवर दिल्या जाणाऱ्या कुर्बानीमुळे विशेष असे महत्त्व आहे. रमजान ईदप्रमाणेच बकरी ईद अत्यंत उत्साहात मुस्लिम बांधव साजरी करीत असतात. माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत बकरी ईदची नमाज सकाळी ८ वाजता होणार असल्याचे या मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजिते व उपाध्यक्ष सिराज अफवारे यांनी सांगितले.

### शस्त्रक्रिया गृहाचे उद्घाटन



**खोपोली** : लोहप प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया गृहाचे उद्घाटन तालुका आरोग्य अधिकारी उरण डॉ. राजेंद्र इटकरे आणि तालुका आरोग्य अधिकारी खालापूर डॉ. प्रसाद रोकडे यांच्या हस्ते करण्यात आले. शस्त्रक्रिया गृह सुरू झाल्याने या भागातील गोरगरीबांची सोय होणार असून, उपचारासाठी फरफट टळणार आहे. छोटे कुटुंब सुखी कुटुंब संकल्पना राबवण्यासाठी लोहप आरोग्य केंद्रामध्ये मोफत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या वेळी डॉ. सीमा पाईकराव यांनी सर्व अपेक्षित महिलांची तपासणी करून शस्त्रक्रिया करण्यासाठी योग्य अशा लाभार्थींना शस्त्रक्रिया करण्यासाठी प्रवृत्त करून शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते.

# रायगडमधील मतदारांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच नेत्रदीपक यश -खासदार तटकरे

**महाड : प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीमध्ये रायगडमधील मतदारांनी विश्वास व्यक्त करून नेत्रदीपक यश मिळवून दिले त्याबद्दल आपण सदैव ऋणी आहोत, असे कृतज्ञ पूर्वक उद्गार नवनिर्वाचित खासदार सुनील तटकरे यांनी महाड येथील आभार सभेमध्ये व्यक्त केले. तर महाड मतदार संघामध्ये मताधिक्य घटले याला कारण मतदारांमध्ये गैरसमज पसरवून अपप्रचार केला असल्याचे सांगताना सर्व गैरसमज आपण दूर करणार असल्याची ग्वाही महाड मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी या सभेमध्ये दिली.

लोकसभा निवडणुकीमध्ये रायगडमधील मतदारांनी भरघोस मताने विजयी करून नेत्रदीपक यश मिळवून दिले त्याबद्दल मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी महाड येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या सभागृहांमध्ये आभार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला नवनिर्वाचित खासदार सुनील तटकरे यांच्यासह रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, आमदार भरत गोगावले, भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपिन महामुणकर, पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर, बालरोग तज्ञ डॉक्टर चंद्रशेखर दाभाडकर, डॉ. प्रभाकर जाधव, भाजपा तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, महाड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष निलेश महाडिक, शिवसेना (शिंदे गट) विजय सावंत, तालुका प्रमुख सुरेश महाडीकचे शहर महिला आघाडी प्रमुख विद्या देसाई, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुभाष निकम, काकासाहेब वैष्णव, चंद्रकांत जाधव, मनोज भागवत यांच्यासह महायुतीतील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते काकासाहेब वैष्णव यांनी आपल्या प्रास्तविकामध्ये नवनिर्वाचित खासदार सुनील तटकरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा व्यक्त करताना महाड शहर आणि तालुक्यातील काही महत्त्वाच्या समस्या सोडवण्याची विनंती केली.

पुढे म्हणाले, मतदार संघामध्ये निवडणूक काळात अदृश्य शक्तीचे वादळ निर्माण झाले असल्याचे जाणवत होते, त्याचा परिणाम मान्य करताना हे वादळ रोखण्याचे काम तटकरेच करू शकतील असा विश्वास व्यक्त केला. खासदार सुनील तटकरे यांच्या महाड विधानसभा मतदार संघातर्फे आमदार भरत शेठ गोगावले यांच्या हस्ते उचित सत्कार करण्यात आला त्यानंतर खासदार तटकरे यांनी मतदारांचे आभार व्यक्त करताना म्हणाले यांनी सर्वप्रथम मतदारसंघातील मतदारांचे आभार व्यक्त केले, १९७७ पासून आपण निवडणुका पाहत आहोत परंतु यावेळची निवडणूक ही पूर्णपणे वेगळी असल्याचे जाणवले, या निवडणुकीमध्ये काही विषयांचा खोचकपणे अपप्रचार करून मतदारांमध्ये गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न झाला, प्रामुख्याने मुस्लिम व दलित समाजामध्ये गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे सांगताना अपप्रचार हा दीर्घकाळ देखील टिकू शकतो आणि त्याचे दूरगामी परिणाम होत राहतात, अशी भीती व्यक्त करीत गैरसमज दूर करण्यात आपण खात्रीने यशस्वी होऊ असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांनी आपल्याला मोलाचे सहकार्य केले आणि त्यामुळेच नेत्र दीपक यश मिळाले असल्याचे सांगून त्यांनी सर्वांचे आभार मानले. भविष्यामध्ये भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्या निधीतून या परिसरातील विकासाची कामे पूर्ण केली जातील, असे आश्वासन खासदार तटकरे यांनी या वेळी दिले.

तर आमदार भरत भोगावले म्हणाले महाड विधानसभा मतदारसंघातून तटकरे यांना २५ हजार मताधिक्य मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते, त्यासाठी आपण प्रचंड मेहनत घेतली, या मतदारसंघातील वाड्या वस्त्यातुन मतदारांपर्यंत पोहचलो आणि म्हणूनच आपल्याला तटकरे निवडून येणार असल्याची खात्री होती. परंतु महाड विधानसभा मतदारसंघांमध्ये मताधिक्य घटल्याची खंत व्यक्त करताना ते म्हणाले, अपप्रचार करून समाजा समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला, या मतदारसंघातील प्रत्येक मतदाराच्या सुखदुःखामध्ये आपण सहभागी झालो तरीही मतदारांनी आपल्याला अपेक्षेप्रमाणे साथ दिली नाही. विरोधक अपप्रचार करण्यात यशस्वी झाले असा आरोप त्यांनी केला, परंतु जोपर्यंत गोगावले आणि तटकरे एकत्र आहेत तोपर्यंत त्यांचा हा प्रयत्न भविष्यामध्ये यशस्वी होऊन देणार नाही असा ठाम विश्वास आ. गोगावले यांनी व्यक्त केला.

रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, पद्मश्री डॉक्टर हिम्मतराव बावस्कर, डॉ. चंद्रशेखर दाभाडकर यांनीदेखील आपले विचार व्यक्त करताना खासदार तटकरे यांचे अभिनंदन केले. महाड तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष निलेश महाडिक यांनी सभेला उपस्थित राहिलेल्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले.

## मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर केबल टाकण्यासाठी खोदकाम

### वाहन चालकांच्या डोक्यावर धोक्याची घंटा

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर केबल टाकण्यासाठी साईड पट्टी खोदल्या जात असताना वाहनचालकांना वाहन चालविणे जिकिरीचे झाले आहे. यामुळे लहान मोठे अपघात घडत आहेत. असे असताना ठेकेदार रात्रीच्या वेळेत जेसीबी मशीनच्या साह्याने रात्रीच्या अंधारात खोद काम करीत आहेत.

मुळात म्हणजे सायं ७ ते सकाळी ७ या वेळेत मशीन चालविणे कायद्याने बंधनकारक असतानाही सर्रासपणे बिनबोभाट या नियमाला फाट्यावर मारत खोद काम सुरू आहे. अंधारात एखादा अपघात घडला तर नियमांचे उल्लंघन करणारे ठेकेदार व दुर्लक्ष करणारे शासकीय बाबू यांना जबाबदार धरून कारवाई करण्याची मागणी वाहनचालक करीत आहेत.



पेण-खोपोली रस्त्याचे पूर्ण झाले नसताना मार्गाच्या साईडपट्ट्यांचे उत्खनन गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी करण्यात येत आहे. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर सुरू असल्याने गाडी खचून अपघात होण्याची शक्यता आहे. पेण-खोपोली रस्त्यावरील आपटी ते काम जोमाने सुरू आहे. संपूर्ण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरलेले आहे पावसाच्या तोंडावर खोद सुरू असल्याने धोक्याची घंटा डोक्यावर घेऊन वाहन चालक प्रवास करीत आहेत. एकत्र पेण खोपोली मार्गाचे काम संथगतीने सुरू आहे. यामुळे अगोदरच अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

खोदकाम सुरू असल्याची माहिती घेऊन तत्काळ सदरचे काम बंद करण्याच्या सुचना देण्यात येतील, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता रवींद्र कदम, यांनी सांगितले.

## कर्जतमध्ये वीकेण्डला पर्यटकांची गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जतच्या ग्रामीण भागात पर्यटनासाठी शनिवार व रविवार मुंबईकर गर्दी करतात. कर्जतच्या ग्रामीण भागात ग्रीन झोन असल्यामुळे मोठ्या प्रमाणात फार्म हाऊस संस्कृती आहे. त्यामुळे दोन दिवसांसाठी या ठिकाणी फार्म हाऊस भाड्याने मिळतात. त्यामुळे ग्रामीण भागातील निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी मुंबईकरांची पावले या ठिकाणी वळतात.



मोठ्या प्रमाणात वाहने आल्यामुळे श्रीराम पुलावर अशीच गर्दी शनिवार व रविवार पहावयास मिळते. त्यामुळे स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो, अनेकदा मुंबईकर व स्थानिकांमध्ये हाणामारीचीसुद्धा प्रसंग अनेकदा घडलेले पाहावयास मिळाले आहेत. जोपर्यंत श्रीराम पूलाचे रुंदीकरण होत नाही, किंवा पर्यायी मार्ग उपलब्ध होत नाही तोपर्यंत वाहतूक कोंडीचा प्रश्न जैसे थे असणार आहे. अनेकदा स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यालय समोर वाहतूक कोंडी होत असते.

आज या वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांचे ज्येष्ठ बंधू मनोहर थोरवे हे रस्त्यावर उतरले होते. व त्यांनी वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्नही केला.

# रोहे शहरातील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे व जिल्हा सचिव अमोल पेणकर यांचे वाढदिवसाच्या औचित्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार १४ जून रोजी रोहे सार्वजनिक बांधकाम उपविभाग विश्रामगृह येथे सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जागतिक रक्तदाता दिनाच्या औचित्याने राज्य रक्त संकलन परिषद अलिबाग यांचे सहयोगाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात अथर्व मोरे व बबलू बर्मा या युवकांनी प्रथमच रक्तदान करत नव रक्तदाते निर्माण करण्याची या शिबिराची परंपरा सुरू राहिली असल्याची माहिती मनसे जिल्हा



सचिव अमोल पेणकर यांनी दिली. या शिबिरात ३५ बाटल्या रक्तसंकलन होत हे शिबिर यशस्वी ठरले.

या शिबिरात भाजप रोहे शहर अध्यक्ष यज्ञेश भांड व शिवसेना शिंदे गटाचे शहरध्यक्ष मंगेश रावकर यांनीदेखील स्वतः रक्तदान केले. यासह भाजपा तालुका अध्यक्ष अमित घाग, सुराज्य प्रतिष्ठान संस्थापक रोशन चाफेकर, महादेव सरसंबे, पत्रकार सचिन साळुंखे, महेंद्र मोरे नितीश सकपाळ, महेश मोहिते यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. रायगड जिल्हा रक्त संकलन परिषद अलिबाग येथील डॉ. शीतल स्वामी, गणेश भोये, अभिषेक घरत, रिद्धी गुरव, उमेश पाटील, रामेश्वर मुळे अमोल साळवी यांचे देखरेखित हे शिबिर पार पडले.

शिबिर यशस्वी होण्यासाठी जिल्हा सचिव अमोल पेणकर यांचे मार्गदर्शनाखाली मा. तालुकाध्यक्ष अक्षय रटाटे, शहर उपाध्यक्ष अमित पवार, उप तालुकाध्यक्ष सुरज मुटके, शहर उपाध्यक्ष महेश साळुंखे, माथाडी कामगार सेनेचे कल्पेश शेळके, उप विभागध्यक्ष कुंजन भोकटे, प्रताप खंडारे, धाटाव विभाग अध्यक्ष महेश वाडकर, श्रवण शेडगे, विनीत कदम, विकी जाधव आदी मनसैनिकांनी परिश्रम घेतले.

## माणगाव वनवासी कल्याण आश्रमशाळेत प्रवेशोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळा उत्तेखोल आश्रमशाळेत नवगत विद्यार्थ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आली होती. वर्गखोल्यांना फुगे व पताकांची सजावट करण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट उभे करण्यात आले होते. ढोल ताश्यांच्या गजरात व औक्षण करून गुलाब पुष्प देऊन नवगत विद्यार्थ्यांचे स्वागत मोठ्या उत्साहाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

हा स्वागतोउत्सव समारोह कार्यक्रम आश्रम शाळेचे शालेय समिती अध्यक्ष महादेव सखाराम जाधव, वनवासी कल्याण आश्रम संकुल समिती सहसचिव नितीन चांदोरकर, शालेय समिती सदस्य लक्ष्मण जंगम, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी पेणचे प्रतिनिधी सूर्यवंशी सर, शाळेचे मुख्याध्यापक अरुण पाटील, उत्तम पाटील, पालक वर्ग, अधीक्षक, अधीक्षिका शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे उपस्थितीत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

## कर्जत तालुक्यात भात बियाणे खरेदीची शेतकऱ्यांची लगबग

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामात भाताची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. त्या शेतकऱ्यांसाठी भाताचे बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी खरेदी विक्री संघ आघाडीवर आहे. शेतकऱ्यांसाठी एक हजार क्विंटल भाताचे बियाणे यांची आवक उपलब्ध करून ठेवली आहे. शेतकऱ्यांनीदेखील भाताचे बियाणे खरेदी करण्यासाठी गर्दी केली असून शेतकऱ्यांसाठी खरेदी विक्री संघ विविध कंपन्यांची बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेत असल्याची माहिती अध्यक्ष काशिनाथ ठमके यांनी दिली आहे.




कर्जत तालुका भाताचे कोठार म्हणून ओळखले जायचे. या कर्जत तालुक्यात सध्या दहा हजार हेक्टर जमिनीवर खरीप हंगामात भाताची शेती केली जाते. गेली काही वर्षात कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरली असून मोठ्या प्रमाणात शेतकरी प्रगतशील शेती करू लागले आहेत. त्यामुळे दरवर्षी वेगवेगळ्या जातीचे संकरित वाण भाताची शेती करण्यासाठी वापरण्याची सवय येथील शेतकऱ्यांना लागली आहे. तालुक्यात करीत हंगामातील शेतीसाठी शेतकरी राजा सज्ज झाला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी संकरित बियाणे यांच्या खरेदीसाठी लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे.

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना सर्वांत मोठा आधार हा येथील कर्जत खरेदी विक्री संघाचा असतो. खरेदी विक्री संघ दरवर्षी किमान एक हजार क्विंटल भाताचे बियाणे उपलब्ध करीत असते. त्यात संकरित बियाणांची विक्री सुरू केली असून संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक केतन खडे यांच्याकडून भाताच्या बियाणांची विक्री सुरू आहे. खरेदी विक्री शेतकरी संघामध्ये कर्जत - ७, कर्जत -३, एमटीयु १० - १०, कोमल, वायसर, जया, जोरदार, सुप्रीम सोनो, वाडा कोलम, चिंटू, रुपाली, तृप्ती अशा जातीचे भाताचे वाण उपलब्ध आहे. कोमल आणि एमटीयु या जातीच्या वाणाला कर्जत तालुक्यात सर्वाधिक मागणी असून साधारण चारशे क्विंटल बियाणी विक्री साठी उपलब्ध आहे.

हे सर्व भाताचे बियाणे शासनाने मान्यता दिलेल्या खासगी नामांकित कंपन्या यांचे बियाणे आहे. त्यांच्याबाबत शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणी असतील तर त्यांनी खरेदी विक्री संघाला संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष काशिनाथ ठमके यांनी केले आहे. तर खरेदी विक्री संघाचे संचालक परशुराम घारे, बाळू थोरवे, सहकार अध्यक्ष सीताराम मंडावळे आदी येथे लक्ष देऊन सर्व शेतकऱ्यांना बियाणे मिळाले पाहिजेत. यासाठी प्रयत्न करीत आहेत.

# रातवड विद्यालयात नवगतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण




**माणगाव : प्रतिनिधी**

शालेय प्रथम दिनाचे औचित्य साधून माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात नवगतांचे शनिवारी (दि. १५) स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले.

शाळेच्या प्रथम दिनाचे औचित्य साधून नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, देवी सरस्वती पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास रातवड ग्रामपंचायत सरपंच वैशाली जाधव, शालेय समिती निमंत्रित सदस्य सतीश पवार, सामाजिक कार्यकर्ते, शिवम कॉम्प्युटरचे संचालक भालचंद्र खाडे, विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक गजानन पाटील, पालक वृंद व मान्यवर उपस्थित होते. शालेय प्रथम दिनाच्या निमित्ताने भुवन ग्रामपंचायत सरपंच दीपक जाधव व मान्यवरांनी विद्यालयास सदिच्छा भेट दिली व नवीन शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थी व विद्यालयास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अजित शेडगे यांनी केले. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या नियोजनातून शालेय प्रथम दिन अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात झाला.

# ऑस्ट्रेलियाचा स्कॉटलंडवर विजय

## इंग्लंड सुपर ८ फेरीसाठी पात्र!






**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकाच्या ३५व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने स्कॉटलंडचा पाच गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाच्या या विजयाचा फायदा इंग्लंडला झाला. ऑस्ट्रेलियाने सामना जिंकताच इंग्लंडने सुपर-८मध्ये स्थान पक्के केले, ज्यामुळे स्कॉटलंडचे सुपर-८मध्ये पोहचण्याचे स्वप्न भंगले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने १८१ धावांचे लक्ष्य दिले होते, जे ऑस्ट्रेलियाने १९.४ षटकांत पार केले. ऑस्ट्रेलियासाठी ट्रॅव्हिस हेडने सर्वांत मोठी खेळी खेळली. मार्कस स्टॉइनिसने त्याला साथ दिली.


स्कॉटलंडसाठी ब्रँडन मॅकमुलेनने सर्वांत मोठी खेळी खेळली. त्याने ३४ चेंडूचा सामना करताना दोन चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ६० धावा केल्या. त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात काही विशेष नव्हती. त्यामुळे स्कॉटलंड सामना जिंकून मोठा उलटफेर करीत विजय खेचून आणेल असे वाटत होते, पण ट्रॅव्हिस हेड आणि मार्कस स्टॉइनिस जोडीने तसे होऊ दिले नाही.

पहिल्या काही विकेट लवकर पडल्यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि मार्कस स्टॉइनिस यांच्या भागीदारीने ऑस्ट्रेलियाला नवसंजीवनी दिली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ८० धावांची (४४ चेंडू) भागीदारी केली. ज्यामुळे सामना मोठ्या प्रमाणावर ऑस्ट्रेलियाच्या बाजूने वळला. ऑस्ट्रेलियाने दोन चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. ट्रॅव्हिस हेडने ४९ चेंडूंत पाच चौकार आणि चार षटकाराच्या मदतीने ७८ धावांची खेळी साकारली. त्याचबरोबर मार्कस स्टॉइनिसने त्याला साथ देताना २९ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकार मारत ५९ धावा केल्या.

१८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची चांगली सुरुवात झाली नाही. संघाने दुसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर डेव्हिड वॉर्नरच्या रूपाने पहिली विकेट गमावली, तो केवळ एक धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी कर्णधार माइल्स मार्श आणि ट्रॅव्हिस हेड यांनी ३२ धावांची (२३ चेंडू) भागीदारी केली. सहाव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर कर्णधार मार्शच्या विकेटसह ही भागीदारी संपुष्टात आली. यानंतर नवव्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ग्लेन मॅक्सवेल बोल्ड होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. मॅक्सवेलने आठ चेंडूत एका षटकाराच्या मदतीने ११ धावा केल्या.

त्यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि मार्क स्टॉइनिस यांनी चौथ्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी केली. ही उत्कृष्ट भागीदारी १६व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर ट्रॅव्हिस हेडच्या विकेटने संपुष्टात आली. हेडने ४९ चेंडूंत पाच चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ६८ धावा केल्या. त्यानंतर १७व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर मार्क स्टॉइनिस पॅव्हेलियनमध्ये परतला. स्टॉइनिसने २९ चेंडूंत नऊ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ५९ धावा केल्या. स्टॉइनिस बाद झाला तेव्हा सामना बहुतांशी ऑस्ट्रेलियाच्या ताब्यात होता.त्यानंतर सहाव्या विकेटसाठी मॅथ्यू वेड आणि टीम डेव्हिड यांनी ३१ (१६ चेंडू) अशी अखंड भागीदारी केली आणि संघाला विजयाची रेषा ओलांडण्यास मदत केली. यादरम्यान, टीम डेव्हिडने १४ चेंडूत तीन चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने नाबाद २४ धावा केल्या आणि मॅथ्यू वेडने पाच चेंडूत नाबाद चार धावा केल्या.

# गौतम गंभीरचे नाव भारताच्या कोचपदासाठी शर्यतीत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२४चा शेवट जवळ येत आहे. त्यामुळे भारताच्या नव्या प्रशिक्षकाबाबतही चर्चा जोरात सुरू झाल्या आहेत. या विश्वचषकानंतर विद्यमान प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपत आहे. अशा परिस्थितीत बीसीसीआय जोमाने नव्या प्रशिक्षकाचा शोध घेत आहे. एका दैनिकाच्या वृत्तानुसार, भारताचा नवा प्रशिक्षक म्हणून माजी डावखुरा सलामीवीर गौतम गंभीरचे नाव निश्चित झाले आहे. जूनच्या अखेरीस त्याची औपचारिक घोषणा केली जाईल.

गौतम गंभीर गेल्या काही वर्षांपासून आयपीएलमध्ये मार्गदर्शक म्हणून उत्तम कामगिरी करीत आहे. त्याच्या नेतृत्वाखालीच कोलकाता नाईट रायडर्स यंदाच्या मोसमात चॅम्पियन बनले आहेत. गेल्या वर्षीपर्यंत तो लखनऊ सुपर जायंट्सचा भाग होता. त्या वेळी लखनऊचा संघही गंभीरच्या नेतृत्वाखाली चांगला खेळत होता. त्यामुळेच सध्या भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी गौतम गंभीरच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे.

वृत्तानुसार गौतम गंभीरने भारताचा मुख्य प्रशिक्षक होण्यास होकार दिला आहे. त्याने बीसीसीआयला कळवले आहे की, तो त्यांच्या कोचिंग स्टाफसह काम करायला तयार आहे. सध्या भारताचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड आहेत. गोलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी पारस म्हांबरे यांच्या खांद्यावर आहे. त्याचवेळी टी. दिलीप हे टीम इंडियाचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक आहेत.

अलिकडेच बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी स्पष्ट केले होते की, वेगवेगळ्या फॉरमॅटसाठी वेगळा प्रशिक्षक असणार नाही. अशा परिस्थितीत तिन्ही फॉरमॅटसाठी एकाच प्रशिक्षकाचा शोध असेल, जो ३.५ वर्षांसाठी भारतीय क्रिकेट संघाची जबाबदारी सांभाळेल. टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक होण्याबाबत गौतम गंभीरने मोठे वक्तव्य केले आहे. या माजी सलामीवीराने सांगितले की, मला भारतीय संघाचा प्रशिक्षक बनायला आवडेल.

# रोहितकडून शिस्तीचे धडे घेतोय : शुबमन गिलने फोटो शेअर करत नेटकऱ्यांना मारला टोमणा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रोहित शर्मा आणि शुबमन गिलमध्ये बिनसले असल्याच्या चर्चा सध्या रंगल्या आहेत. सोशल मीडियावर तर शुबमन गिलने रोहित शर्माला इन्स्टाग्रामला अनफॉलो केल्या असल्याचे स्क्रिनशॉट व्हायरल झाले होते, पण आता शुबमन गिलने इन्स्टाग्रामवर रोहित शर्मा आणि त्याच्या लेकीसोबत फोटो शेअर केला आहे. या फोटोवरील कॅप्शनने त्याने सर्व चर्चांना योग्य उत्तर देत बोलती बंद केली आहे.

भारताचे गट टप्प्यातील सामने संपले असून भारतीय संघ पुढील फेरी खेळण्यासाठी वेस्ट इंडिजला रवाना होणार आहे. भारताने गट टप्प्यातील सुरुवातीचे तिन्ही सामने खेळून सुपर ८ फेरीत धडक मारली. वर्ल्डकपसाठी जेव्हा भारतीय संघाची घोषणा झाली तेव्हा पाच सदस्यीय संघासोबत चार राखीव खेळाडूंचाही समावेश होता. ज्यामध्ये शुबमन गिल, आवेश खान, रिंकू सिंग आणि खलील अहमद यांचा समावेश होता. आता भारताचे गट टप्प्यातील सामने संपल्याने चारपैकी दोन राखीव खेळाडू हे मायदेशी परतणार असल्याचे वृत्त समोर आले होते. या वृत्तासोबतच शुबमन गिलला शिस्तभंग केल्यामुळे कारवाई म्हणून संघातून रिलीज केले दात असल्याचे म्हटले, तर दुसरीकडे गिलने रोहितला इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याची चर्चा सुरू झाली. यावर आता गिलने रोहित शर्मा आणि समायरासोबतचा फोटो शेअर करीत या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

गिलने या इन्स्टाग्रामवरील पोस्टमध्ये दोन फोटो शेअर केले आहेत. एक रोहितसोबतचा आणि खाली त्याची लेक समायारासोबतचा फोटो आहे आणि कॅप्शनमध्ये लिहिले की, मी आणि सॅमी रोहितकडून शिस्तीचे धडे घेत आहोत आणि पुढे रोहितला टॅग केले आहे. या पोस्टसह गिल आणि रोहितमध्ये सगळे अलबेल असल्याचं समोर आले आहे, तर गिलने या सुरू असलेल्या चर्चांवर आणि अफवा पसरवणाऱ्यांना चांगलाच टोमणाही मारला आहे.







**पनवेल :** शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी विविध मान्यवरांसह मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह, आमदार महेश बालदी व कोकण पदवीधर मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांचेही स्वागत करण्यात आले.

# राहुल द्रविडची कॅनडाच्या ड्रेसिंग रूमला सरप्राईज भेट



**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

भारत आणि कॅनडामध्ये प्रथमच क्रिकेट सामना खेळवला जाणार होता, पण फ्लोरिडामधील सततच्या पावासामुळे सामना रद्द करण्यात आला. भारतीय संघ पहिले तीन सामने जिंकत सुपर ८साठी क्वालिफाय झाला होता, तर कॅनडाचा संघ स्पर्धेतून बाहेर झाला होता, पण कॅनडाच्या संघाला टी-२० चॅम्पियन संघाविरूद्ध खेळण्याची मोठी संधी होती ती अपूर्णच राहिली. या सामन्यानंतर भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी कॅनडाच्या ड्रेसिंग रूमला अचानक भेट दिली. ज्याचा व्हीडिओ आयसीसीने शेअर केला आहे.

द्रविड यांनी कॅनडा संघाला भेट देत त्यांचे कौतुक केले. २००३मध्ये स्कॉटलंडमध्ये खेळतानाचा एक किस्सा त्यांना यावेळेस आठवला आणि त्यांनी सांगितले की सहयोगी राष्ट्र म्हणून खेळण्याच्या संघातील संघर्षांचा उल्लेख केला. उल्लेखनीय म्हणजे, द्रविडने स्कॉटलंडसाठी त्यांच्या राष्ट्रीय क्रिकेट लीगमध्ये ११ एकदिवसीय सामने खेळले. कॅनडा संघातील खेळाडूंशी बोलताना द्रविड म्हणाले, खूप धन्यवाद. या स्पर्धेत तुम्ही दिलेल्या अप्रतिम योगदानाचे कौतुक आहे. मला वाटते की हा खेळ खेळण्यासाठी तुम्हा सर्वांना ज्या संघर्ष आणि आव्हानांना सामोरे जावे लागेल ते आपल्या सर्वांना माहित आहे.

पुढे द्रविड म्हणाले, हे सोपं नाहीय. स्कॉटलंडमध्ये २००३मध्ये क्रिकेट खेळलो होतो. त्यामुळे मला माहित आहे की, सहयोगी देशांसाठी खेळण्यासाठी किती संघर्ष आहे, पण म्हणून तुम्ही लोक आम्हा सर्वांसाठी खरोखरच प्रेरणा आहात, ज्यांनी या खेळावर त्यांच खरंच किती प्रेम आहे, हे दाखवून दिले. तुम्ही या स्पर्धेत खेळण्यासाठी ज्या प्रकारचा त्याग करण्यास तयार आहात, ते कौतुकास्पद आहे. मी हेच सांगेन की तुम्ही तुमच्या देशातील तरुण मुलामुलींना क्रिकेट खेळण्यासाठी अधिक प्रेरणा देत आहात. जे जागतिक क्रिकेटसाठी खूप चांगले आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com